



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक २५६ * नांदेड * शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211




गोदातीर समाचार

**सुट्टीची सुचना**

आज अनंत चतुर्दशीनिमित्त कार्यालयास सुट्टी असल्याने उद्या दि. २६ सप्टेंबर २०२६ चा गोदातीर समाचारचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी नोंद घ्यावी.

–व्यवस्थापक

आज अनंत चतुर्दशी

# मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरूद्ध वाढता रोष

## ४८ तासांत राजीनामा न दिल्यास देशव्यापी आंदोलन -दिपके

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरूद्ध देशात रोष वाढताना दिसून येत आहे. यातच ज्ञानेश कुमार यांनी ४८ तासांत राजीनामा न दिल्यास देशव्यापी आंदोलनाचा इशारा सीजेपीचे अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी दिला आहे.

कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी आता निवडणूक आयोगाचे आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर हल्लाबोल केला आहे. ज्ञानेश कुमार हे सर्वात मोठे देशद्रोही आहेत. त्यांनी तत्काळ राजीनामा द्यायला हवा. भारताच्या लोकशाहीला त्यांनी सर्वात मोठा धोका निर्माण केला आहे. ज्ञानेश कुमार निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त झाल्यानंतर ते ठरवत आहेत की, कोणी मतदान करायचे आणि कोणी करायचे नाही. ही लोकशाही आहे का? त्यांनी पूर्ण लोकशाही उलथवून लावली आहे, असा घणाघाती आरोप करत अभिजीत दिपके यांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत देशव्यापी आंदोलनाची हाक दिली आहे.



पुढच्या ४८ तासांत ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा न दिल्यास कॉक्रोच जनता पार्टी देशव्यापी आंदोलन सुरू करेल. दिल्लीतून आम्ही या आंदोलनाची सुरूवात करू, अशी घोषणा अभिजीत दिपके यांनी केली.

अभिजीत दिपके यांनी पुढे बोलताना मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी काय केले याची माहिती दिली. महाराष्ट्र, उत्तर प्रदेशमध्ये दोन कोटींहून अधिक मतदार हटवले आहेत. पश्चिम बंगालमधील ९० लाख लोकांना मतदान करू दिले नाही. दिल्लीत ४७ लाख मतदार वगळले जात आहे. केरळमध्ये २४ लाख, तमिळनाडूत ९७ लाख, कर्नाटकमध्ये १ कोटी, तेलंगणात ७३ लाख मतदार वगळले जात आहेत. सर्व राज्यांची आकडेवारी एकत्र केल्यास १३ कोटींहून अधिक मतदारांचा हक्का हिरावला जात आहे, असा आरोप अभिजीत दिपके यांनी केला.

### ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात याचिका

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आलेल्या काही निर्णय व प्रशासकीय प्रक्रियांवर प्रश्न उपस्थित करत मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात गुरुवारी एक याचिका करण्यात आली आहे. केंद्रीय निवडणूक आयोग, नवी दिल्ली, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी तसेच राज्य निवडणूक आयोगाला याचिकेत प्रतिवादी करण्यात आलेले आहे.

# स्लीपर एसी बसला लागलेल्या भीषण आगीत ९ जण जिवंत जळाले



**लखनऊ (प्रतिनिधी)–** उत्तर प्रदेशातील नोएडा येथे यमुना एक्सप्रेसवेवर एका स्लीपर एसी बसला आग लागली. या अपघातात नऊ प्रवासी जिवंत जळाले. यामध्ये आठ पुरुष आणि एका महिलेचा समावेश होता. बसमध्ये ३५ प्रवासी होते. अनेक प्रवाशांनी खिडक्या फोडून आणि बाहेर उडी मारून स्वतःचा जीव वाचवला, तर इतर २० जणांना वाचवण्यात आले. मृतदेह खूप जळाले होते आणि त्यांची ओळख पटवणे कठीण आहे. हा अपघात बुधवारी रात्री साडे अकराच्या सुमारास जेवर विमानतळापासून ५०० मीटर अंतरावर घडला.

सीएफओ प्रदीप कुमार यांनी सांगितले की, ही बस दिल्लीच्या काश्मिरी गेटवरून महोबासाठी निघाली होती. प्राथमिक तपासानुसार एसी इंजिनमधील ठिणगी किंवा स्फोटामुळे आग लागली. अग्निशमन दलाची पाच वाहने घटनास्थळी दाखल झाली आणि त्यांनी ४५ मिनिटांत आग विझवली. अग्निशमन दलाच्या जवानांनी बसमध्ये प्रवेश करण्यासाठी स्लीपर बसचा मागील भाग कापला आणि एकेक करून मृतदेह बाहेर काढले. बचावकार्य सुमारे दोन तास चालले. आग इतकी भीषण होती की, बस पूर्णपणे आगीच्या भक्ष्यस्थानी पडली होती. ही बस मध्य प्रदेशातील राज कल्पना ट्रॅव्हल्सची आहे. यासाठी १९ चालान आकारण्यात आले आहेत. १.७५ लाख रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे.

# आज नांदेडसह राज्यातील २१ जिल्ह्यांना पावसाचा अलर्ट

**मुंबई (प्रतिनिधी)–** शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर रोजी अनेक जिल्ह्यांत पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागाकडून वर्तविण्यात आली आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील २१ जिल्ह्यांना अलर्ट जारी करण्यात आला आहे.

मराठवाड्यात अनेक जिल्ह्यांत पावसासोबत जोरदार वाऱ्याचा अंदाज आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिवमध्ये काही ठिकाणी ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून, काही जिल्ह्यांत हलका ते मध्यम पाऊस होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे सर्वच जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

कोकणात पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगडमध्ये हलक्या पावसाची शक्यता आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्येही हलका पाऊस राहण्याची शक्यता आहे. कोकण विभागांत पावसाचा जोर कमी राहणार असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे. त्यामुळे कुठलाही अलर्ट जारी करण्यात आलेला नाही.

उत्तर महाराष्ट्रात धुळे आणि नंदुरबारमध्ये २५ सप्टेंबरला हवामान कोरडे राहण्याचा अंदाज आहे. जळगावमध्ये ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने जोरदार वारे वाहू शकतात. त्यामुळे यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. नाशिक, घाटमाथा परिसर आणि अहिल्यानगरमध्ये मेघगर्जनेसह हलक्या सरींची शक्यता आहे.

विदर्भात पावसाचा जोर अधिक राहण्याची शक्यता आहे. भंडारा, चंद्रपूर आणि गोंदिया जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. अकोला, अमरावती, बुलढाणा, गडचिरोली, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळमध्ये वादळी वाऱ्यासह आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. त्यामुळे यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

पश्चिम महाराष्ट्रात पुणे आणि पुणे घाटमाथा परिसरात हलका पाऊस होऊ शकतो. कोल्हापूर, सातारा आणि सांगलीमध्येही हलक्या पावसाची शक्यता आहे. तसेच घाटमाथा परिसरातही मेघगर्जनेसह हलक्या पावसाची शक्यता आहे. सोलापूरमध्ये ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने जोरदार वारे वाहू शकतात. त्यामुळे यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# कुंडलवाडी-शेळगाव थडी रस्त्यावर भीषण अपघात; दाम्पत्याचा मृत्यू

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** कुंडलवाडी ते शेळगाव थडी जाणाऱ्या रस्त्यावर गुरुवारी दुपारी सुमारे १२ वाजेच्या सुमारास वळणाजवळ झालेल्या भीषण मोटारसायकल अपघातात बिलोली येथील दाम्पत्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

या अपघातात पुष्पा उर्फ सुमलता गंगाधर चिद्रावार (वय ३२) आणि गंगाधर विजय चिद्रावार (वय ४०), रा. देशमुख नगर, बिलोली यांचा मृत्यू झाला आहे. दोघेही मोटारसायकलवरून



प्रवास करत असताना हा अपघात घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, त्यांची ग्रे रंगाची हिरो होंडा मोटारसायकल (क्रमांक एमएच २६ वाय १६८६) होती. कुंडलवाडी ते शेळगाव थडी मार्गावरील वळणाजवळ मोटारसायकलचा अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

या घटनेत दोघांचाही मृत्यू झाल्याने चिद्रावार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अपघाताची माहिती मिळताच संबंधित पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन घटनेची नोंद व पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे.

या दुर्दैवी घटनेमुळे बिलोली व परिसरात हळहळ व्यक्त होत असून, अपघात नेमका कशामुळे झाला, याबाबत पोलिसांकडून अधिक तपास करण्यात येत आहे.

# नांदेड पोलिसांचा दणका! गणेश विसर्जनापूर्वी ८२८ गुंडांना गावबंदी; मिरवणुकीत दिसलात तर थेट आत -एसपी डॉ. नीलभ

**नांदेड (प्रतिनिधी)–** गणेशोत्सव आणि विसर्जन मिरवणुका शांततेत पार पाडण्यासाठी नांदेड पोलिसांनी गुन्हेगारांविरुद्ध सर्वात मोठी प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या संकल्पनेतील '२+ स्कीम' अंतर्गत जिल्ह्यातील ८२८ समाजकंटकांवर बीएनएसएस कलम १६३ अन्वये गावबंदीचे आदेश काढण्यात आले आहेत.

२५ सप्टेंबर रोजी होणाऱ्या मुख्य विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर अवैध दारू विक्री, जुगार, दहशत निर्माण करणारे आणि मिरवणूक मार्गावर घोषणाबाजी व तेढ निर्माण करण्याचा इतिहास असलेल्या गुन्हेगारांना लक्ष्य करण्यात आले आहे.

ही विशेष मोहीम अपर पोलीस अधीक्षक तथा विशेष कार्यकारी दंडाधिकारी अर्चना पाटील आणि सुरज गुरव यांनी राबवली. या कारवाईत नांदेड विभागात ४६८ जणांवर, भोकर विभागात ३६० जणांवर असे एकूण ८२८ जणांना गावबंदी केली आहे.

**पोलीस ठाणेनिहाय गावबंदी संख्या :** वजिराबाद– ५०, शिवाजीनगर– ३५, भाग्यनगर–



५०, इतवारा– ५५, नांदेड ग्रामीण– ५०, मुदखेड– १६, भोकर– १५, हदगाव– ५०, उस्माननगर– ९, कुंडलवाडी– ५२, सिंदखेड– ५२, माहूर– २०, किनवट– ३२, इस्लापूर– १०, कुंटूर– ४०, अर्धापूर– ७४, देगलूर– २५, उमरी– २९, मुखेड– ९, मारखेल– २०, नायगाव– ९२, रामतीर्थ– ३३, लिंबगाव– १०.

ज्या गुंडांवर मनाई आदेश आहेत, त्यांनी विसर्जनाच्या दिवशी संबंधित गावात किंवा मिरवणूक परिसरात प्रवेश केल्यास बीएनएस आणि महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये थेट गुन्हा दाखल करून कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन यांनी दिला आहे.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर प्रशासन अलर्ट; मुख्यालय सोडल्यास निलंबनासह गुन्हा दाखल होणार -जिल्हाधिकारी कर्डिले

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून पाणीटंचाई, चारा टंचाई आणि पिकांचे नुकसान यामुळे शेतकरी आर्थिक व मानसिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी आत्महत्यांना आळा घालण्यासाठी शासनाकडून कर्जमाफी, बियाणे– खते वाटप आणि पिक कर्ज पुनर्गठनाची युद्धपातळीवर अंमलबजावणी सुरू आहे. त्यामुळे जिल्ह्यातील कर्मचारी, अधिकाऱ्यांनी आपल्या कर्तव्यात कसूर करू नये असा इशारा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिला आहे.

दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता राज्यात 'आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५' लागू करण्यात आला आहे. यानुसार जिल्हाधिकारी हे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत. अशा संवेदनशील परिस्थितीत अधिकाऱ्यांनी मुख्यालय सोडणे हे शेतकऱ्यांप्रती असंवेदनशील वर्तन ठरेल, असे प्रशासनाचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडून कठोर निर्देश जारी करण्यात आले आहेत.

**मुख्यालय सोडण्यास सक्त मनाई**

महसूल, कृषी, ग्रामविकास, नगरविकास, महावितरण, पशुसंवर्धन, जलसंपदा, जलसंधारण, सहकार आणि भूमी अभिलेख या विभागांच्या जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी पूर्णवेळ मुख्यालयी हजर राहून दुष्काळ निवारणाची कामे प्राधान्याने करावीत.

**रजा मंजुरीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे**

दुष्काळी आणीबाणी संपेपर्यंत कोणत्याही अधिकाऱ्याची रजा (अतितातडीची वैद्यकीय रजा वगळता) केवळ जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीनेच मंजूर होईल.

**रजेची कार्यपद्धती**

अधिकाऱ्यांनी परस्पर रजा मंजूर करून गैरहजर राहू नये. रजेचा अर्ज विभागप्रमुखांच्या अभिप्रायासह थेट जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावा लागेल.

**उल्लंघन केल्यास दुहेरी कारवाई**

विनापरवानगी गैरहजर राहणाऱ्या अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ नुसार निलंबन व विभागीय चौकशी.

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या कलम ५१, ५५ व ५६ अंतर्गत दंडात्मक व फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.


# १ ऑक्टोबरपासून एटीएममधून पैसे काढण्यासाठी शुल्क लागणार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशातील सर्वात मोठी सार्वजनिक क्षेत्रातील बँक असणाऱ्या 'भारतीय स्टेट बँकेने' आपल्या ग्राहकांना मोठा झटका दिला आहे. बँकेने १ ऑक्टोबर २०२६ पासून कॅश काढण्याच्या नियमांमध्ये महत्त्वाचे बदल केले आहेत. नव्या नियमांनुसार, ठरवून दिलेल्या मोफत मर्यादेपेक्षा जास्त वेळा पैसे काढल्यास ग्राहकांच्या खिशाला अतिरिक्त फटका बसणार आहे.

एसबीआयने स्पष्ट केले आहे की, हा नियम बँकेच्या सर्व खातेदारांना लागू होणार नाही. हा बदल प्रामुख्याने बँकेच्या शाखांद्वारे उघडण्यात आलेल्या (बीएसबीडी) म्हणजेच बेसिक सेव्हिंग्स बँक डिपॉझिट खात्यांशी संबंधित ग्राहकांसाठी लागू करण्यात आला आहे.



**नांदेड–** श्री गणेश विसर्जन निर्विघ्न पार पडावे, यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातून पोलीस दलाच्यावतीने पथसंचलन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने व बंदोबस्त कामी आलेले अधिकारी, कर्मचारी दिसत आहेत.




# अभिनेते मुश्ताक खान यांचे निधन



**मुंबई (प्रतिनिधी)–** प्रसिद्ध अभिनेते मुश्ताक खान यांचं निधन झालं. 'वेलकम', 'गदर' 'आशिकी', 'मुझसे शादी करोगी' आणि 'हम हैं राही प्यार के' यांसारख्या अनेक चित्रपटातील अभिनयातून प्रेक्षकांच्या हृद्यात स्थान मिळवणाऱ्या मुश्ताक खान यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या बऱ्याच काळापासून ते आजारी होते, मुंबईतील नानावटी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. रिपोर्ट्सनुसार, त्यांना सुमारे पाच वर्षांपूर्वी कॅन्सरचं निदान झालं होतं.

# गुलालमुक्त श्री गणेश विसर्जन मिरवणुकीचा २३ वर्षांचा आदर्श: २८ मंडळांचा आज पोलिसांकडून सन्मान

**लातूर (प्रतिनिधी)–** लातूर जिल्ह्यातील औसा शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांनी गुलाल मुक्त विसर्जन मिरवणुकीचा आदर्श गेल्या २३ वर्षांपासून जपला आहे. शहरातील सर्व गणेश मंडळे मिरवणुकी दरम्यान गुलालाऐवजी फुलांची उधळण करत असतात. अशा २८ मंडळांचा आज पोलिसांकडून सन्मान करण्यात येणार आहे.

औसा शहरातील धार्मिक सहिष्णुता व सामाजिक सलोखा कायम राहावा या उदात्त हेतूने, सन २००३ चे गणेशोत्सवापासून, गणेशोत्सव मिरवणुकीदरम्यान गुलालाऐवजी फुलांच्या पाकळ्यांची उधळण करण्याचा अनोखा व स्तुत्य उपक्रम सुरू करण्यात आला होता.

यंदा गुलाल मुक्त गणेशोत्सवाचे हे २४ वे वर्ष असून, सदरचा आदर्शवत उपक्रम औसा शहरातील सर्व गणेश मंडळांनी कायम ठेवला असून, हा उपक्रम इतर गणेश मंडळांसाठीही निश्चितच प्रेरणादायी व अनुकरणीय ठरला आहे.

सामाजिक परिस्थितीचे भान ठेवून औसा शहरातील सामाजिक ऐक्य, एकोपा व एकात्मता जोपासण्यात या मंडळांचे मोलाचे योगदान राहिले आहे. या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन या सर्व २८ मंडळांना उद्या दिनांक २५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता औसा शहरातील विसर्जन मिरवणूक सुरू होण्यापूर्वी नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचे हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

सदर कार्यक्रमासाठी औसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, नगराध्यक्ष डॉ. अफसर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार चौधरी, पोलीस निरीक्षक रेवणनाथ डमाळे, यांचेसह औसा पोलीस स्टेशनचे तत्कालीन पोलीस निरीक्षक कालिदास सूर्यवंशी हे उपस्थित राहणार आहेत.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# गणपतीबाप्पाला निरोप देताना...

श्री गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या उत्साहाची आज सांगता होत आहे. भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाने भारलेले हे दिवस आता विसर्जनाच्या मिरवणुकीने पूर्णत्वास जाणार आहेत. मात्र हा शेवटचा दिवस केवळ जल्लोषाचा नसून नागरिक आणि प्रशासन या दोघांच्याही जबाबदारीची परीक्षा घेणारा दिवस आहे. आनंदाला उधाण आले तरी त्या आनंदाला शिस्त, संयम आणि सुरक्षिततेची किनार असलीच पाहिजे. नांदेड जिल्ह्याने अनेक वर्षे धार्मिक सलोखा आणि सामाजिक शांततेची परंपरा जपली आहे. विविध धर्मांचे सण येथे परस्परांच्या भावनांचा आदर राखत साजरे केले जातात. ही परंपरा टिकविण्यात नागरिकांइतकीच प्रशासनाची भूमिकाही महत्त्वाची आहे. गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी, कोणत्याही समाजाच्या भावना दुखावल्या जाऊ नयेत आणि समाजकंटकांना वातावरण बिघडविण्याची संधी मिळू नये, यासाठी प्रशासनाने पूर्वनियोजन, प्रभावी बंदोबस्त आणि तत्पर कारवाई यावर भर देणे आवश्यक आहे. धर्माच्या नावावर समाजात फुट पाडण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना चोख कायदेशीर उत्तर दिले गेले पाहिजे. त्यामुळे विसर्जन मिरवणूक ही कोणत्याही समाजाविरुद्ध शक्तिप्रदर्शनाची संधी न बनता बंधुभावाचे आणि सामाजिक ऐक्याचे प्रदर्शन ठरली पाहिजे. यासाठी पोलीस प्रशासनाने संवेदनशील भागांमध्ये विशेष लक्ष ठेवणे, अफवा आणि समाजमाध्यमांवरील भडक संदेशांवर तातडीने नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. विसर्जनाच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर गर्दी होणार हे प्रशासनाला आधीपासूनच ज्ञात असते. त्यामुळे वाहतूक नियोजन, मिरवणुकीचे मार्ग, पर्यायी रस्ते, गर्दीचे नियंत्रण, पार्किंगची व्यवस्था आणि आपत्कालीन मार्ग यांचे नियोजन केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात प्रभावीपणे राबविले पाहिजे. पोलीस, वाहतूक शाखा, स्थानिक प्रशासन आणि स्वयंसेवक यांच्यात समन्वय असणे अत्यावश्यक आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा दुर्घटना होऊच नये यासाठी प्रतिबंधात्मक व्यवस्था करणे, ही प्रशासनाची खरी कसोटी आहे. पर्यावरणाच्या दृष्टीनेही प्रशासनाची जबाबदारी मोठी आहे. गणेशमूर्ती आणि निर्माल्य विसर्जनासाठी कृत्रिम तलाव किंवा स्वतंत्र विसर्जन केंद्रांची व्यवस्था करून नागरिकांना त्याबाबत पुरेशी माहिती देणे, त्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था ठेवणे आणि विसर्जनानंतर जलस्रोतांची स्वच्छता करणे, ही स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी आहे. नदी, तलाव किंवा विहिरींमध्ये मूर्ती विसर्जित केल्यामुळे जलप्रदूषण होणार असेल तर त्यावर केवळ आवाहन करून भागणार नाही; पर्यायी व्यवस्था सहज उपलब्ध करून देणे आणि नियमांचे प्रभावी पालन करून घेणे ही प्रशासनाची भूमिका आहे. निर्माल्य संकलनासाठी स्वतंत्र व्यवस्था उभारणे, ते कचऱ्यात न मिसळता कंपोस्ट किंवा सेंद्रिय खतनिर्मितीसाठी वापरणे आणि विसर्जनस्थळांची स्वच्छता राखणे, याकडेही प्रशासनाने गांभीर्याने पाहिले पाहिजे. उत्सव संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी नदीकाठ, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणे कचऱ्याने भरलेली दिसणे ही उत्सवाच्या व्यवस्थापनाची चांगली खूण ठरू शकत नाही. ध्वनीप्रदूषणाचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. डॉल्बी, ध्वनिक्षेपक किंवा ढोल-ताशांच्या माध्यमातून होणारा आवाज कायदेशीर मर्यादेत आहे की नाही, याची तपासणी करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. नियम असतील तर त्यांची अंमलबजावणीही समान पद्धतीने झाली पाहिजे. कोणत्याही मंडळावर कारवाई करण्यास संकोच आणि दुसरीकडे दुर्लक्ष, अशी दुहेरी भूमिका प्रशासनाच्या विश्वासार्हतेला धक्का देऊ शकते. नियम सर्वांसाठी समान असणे आणि त्यांची अंमलबजावणी पारदर्शक असणे आवश्यक आहे. विसर्जनस्थळी आरोग्य विभागाची पथके, रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि आवश्यक आपत्कालीन सुविधा सज्ज ठेवणेही महत्त्वाचे आहे. गर्दीच्या ठिकाणी एखादी व्यक्ती बेशुद्ध पडली, जखमी झाली किंवा पाण्यात दुर्घटना घडली तर काही मिनिटांचा विलंबही जीवघेणा ठरू शकतो. त्यामुळे आपत्कालीन यंत्रणा केवळ कागदोपत्री उपलब्ध न राहता प्रत्यक्ष घटनास्थळी तत्पर असली पाहिजे. मात्र प्रशासनाने कितीही चांगले नियोजन केले तरी नागरिकांचे सहकार्य नसेल तर व्यवस्था अपुरी पडते. कायद्याचे पालन करणे, पोलिसांच्या सूचनांचे पालन करणे, अफवांवर विश्वास न ठेवणे, धोकादायक कसरती टाळणे, मद्यपान करून मिरवणुकीत सहभागी न होणे आणि पर्यावरणपूरक विसर्जन करणे, ही नागरिकांची जबाबदारी आहे. गणरायाचे विसर्जन म्हणजे एका मूर्तीचा निरोप नव्हे; तर पुढील वर्षभरासाठी आपण स्वीकारलेल्या मूल्यांची आठवण आहे. त्यामुळे प्रशासनाने सुरक्षा, शिस्त, पर्यावरण आणि कायदा-सुव्यवस्था याबाबत कोणतीही तडजोड न करता नागरिकांच्या उत्साहाला सुरक्षित दिशा द्यावी आणि नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करावे. मिरवणूक संपेल, ढोल थांबतील, रोषणाई विझेल आणि गणराय निरोप घेईल. मात्र या उत्सवातून सामाजिक सलोखा, सुरक्षितता आणि पर्यावरणाचे भान पुढील वर्षभर टिकले पाहिजे. आनंदाला उधाण येऊ दे; पण प्रशासनाचे नियोजन आणि नागरिकांचा विवेक या दोन्हींचा बांध फुटू देऊ नका. हाच सुरक्षित आणि जबाबदार गणेशोत्सवाचा खरा संदेश!

# निरोप घेतो देवा, आता आज्ञा असावी!




निरोप घेतो देवा आता आज्ञा असावी।
चुकले आमचे काही तर क्षमा असावी.

हे गजानना, गणराया, गणनायका तुझी कृपादृष्टी आमच्यावर सदैव राहू दे.. आमच्या लज्जेचे रक्षण तू कर.याची सदैव तुला चिंता असू दे. दीन -दुबळ्या लोकांचे तू नेहमी संरक्षण कर.तुझ्याशिवाय आम्हांला कोणीही नाही.आम्ही तुझे जन्मोजन्मीचे दास आहोत. आम्हाला कोणत्याही गोष्टीचा अहंकार नाही. म्हणून निरोप घेताना आम्हाला तू काही आमचे चुकले असेल तर माफ करून टाक. आणि पुढल्या वर्षी लवकर ये.. अशी याचना भक्तगण गणरायांना विसर्जित करताना आपल्या मुखातून सहज करताना दिसतात. १४ सप्टेंबरला गणेश चतुर्थी होती. त्या दिवशी गणपती बाप्पाचे आगमन झाले.सर्वत्र आनंदोत्सव साजरा करण्यात आला. जगामध्ये जवळजवळ सर्व देशांमध्ये तुला पहिला पूजेचा मान आहे.आपल्या घरादारात, वाड्या वस्त्यावर शाळा महाविद्यालयात अनेक चौका-चौकात योग्य ठिकाणी तुझी प्राणप्रतिष्ठा केली जाते. विसर्जनच्या वेळी हा अभंग म्हटला जातो. खरोखरच तो म्हणताना आमच्या डोळ्यांमध्ये अश्रू येतात. तुला दहा दिवस घरामध्ये ठेवून तुझी पूजा मनोभावे केली जाते.आरती,आराधना, पूजा, उपासना, उपवास करून दूर्वा वाहून कापूराने तुझी आरती करून संपूर्ण जगात तुला वंदन करून विसर्जित केले जाते. या दहा दिवसांमध्ये अनेक कलाकारांच्या कलेला वाव मिळतो. दुकानामधून करोडो रुपयांची उलाढाल केली जाते. लाईटच्या झगमगाट तुझ्या सभोवताली केला जातो. गणपती माझा नाचत आला म्हणून आबालवृद्धांना आनंद मिळतो. खेड्यापाड्यात सुद्धा गणपतीच्या निमित्ताने सर्व लोक एकत्रित येतात आणि सामाजीक बांधिलकी जोपासली जाते.

अनेक जाती धर्माचे लोक एकत्रित येतात. त्यामुळे सर्वधर्मसमभाव निर्मिती हे नैतिक मूल्ये गणेशोत्सवामधून निर्माण होते. खरोखरच एका बाजूला धार्मिक सण म्हणून न पाहता या सणातून मिळणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला ज्ञान, विज्ञान याची माहीती होते. करोडो मूर्ती तयार करण्यासाठी कलाकारांना घाम गाळून हे काम करावे लागते. त्यामुळे त्या मूर्तीचे विसर्जन करताना डोळ्यातून खरोखर अश्रू येतात. आजकाल आपल्या हातून झालेल्या चुका पुन्हा होऊ नयेत म्हणून गणरायाच्या समोर चुकलो आता देवा आम्ही क्षमा असावी.असं का म्हटलं जाते बरे ? प्रत्येकाने या अभंगाचा बारकाईने विचार करावा आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या वाईट गोष्टी पासून सावध राहावे. लेकींबाळीचा आदर करावा. सर्वधर्मसमभावने वागावे.

लाच, भ्रष्टाचार या गोष्टीपासून दूर राहावे. आई-वडिलांची सेवा करावी. त्यावेळेस आपले काही चुकत नाही. अगोदर मुद्दाम चुका करायच्या आणि नंतर चुकले आमचे देवा म्हणून क्षमा मागायची. हे नीतिमत्तेला धरून नाही. म्हणून प्रत्येकाने विवेक जागा ठेवून वागावे. हे गणराया.. तुझ्यापुढे आम्ही नतमस्तक होत आहोत आणि आम्ही तुझी सर्वजण लेकरू आहोत. तू सर्वांना समानतेने वागावं. आम्हाला चांगली सद्बुद्धी दे. अशी प्रार्थना करावी.तरच समाजामध्ये एकत्रितपणा येईल. आपण सगळे एक आहोत.याची जाणीव होईल. दर दिवस आरतीचा मान अनेक लोकांना दिला जातो. त्यामुळे आपण सगळे एक आहोत, याची जाणीव होते.

हे अष्टविनायका तुझा महिमा फार मोठा आहे.तू जगात वंदनीय आहेस. त्यामुळे तुला निरोप देण्यासाठी आम्ही सज्ज झालो आहोत. कोणी दोन दिवसांमध्ये तुझे विसर्जन करते. कोणी पाच दिवसात, नऊ दिवसात आणि शेवटी अनंत चतुर्थीला तुला सर्वजण डोळ्यात पाणी आणून क्षमा मागतात. तुझे विसर्जन करतात. कोकणात तर डोळ्यांचे पारणे फिटेल असे तुझे शेकडो रूपे आम्हांला दिसतात. म्हणून हे करुणाकारा, ओमकार स्वरुपा हे पार्वतीच्या बाळा सर्वांना तु तुझ्या डोळ्यांनी पहा. हे गणराया तुला निरोप देताना घरातील छोटे मुले खरोखर रडत बसतात. तू घरातून बाहेर जाऊच नये. असे प्रत्येकाला वाटते. परंतु तुझे विसर्जन करणं हे सुद्धा महत्त्वाचा विषय आहे.

कारण तुला पुढल्या वर्षी परत लवकरच यायचे आहे. म्हणून तुझं येणं आणि जाणं शतकानुशतके चालत आहे. समाजात चालू असलेल्या वाईट प्रथांची होळी करावी. नक्षलवाद, दहशतवाद, प्रांतवाद, भाषावाद, उच्चनीचता अस्पृश्यता, भेदाभेद करणाऱ्या ह्या सर्व गोष्टी तु बाजूला कर त्यासाठीच आम्ही तुझी क्षमा मागत आहोत. तुझे विसर्जन करते वेळी पाण्यामध्ये बुडणाऱ्या भक्तगणांना वाचावं. कारण त्याच कुटुंब घरी त्याची वाट पाहत आहे. म्हणून हे लंबोदरा तू सर्वत्र तुझी कृपादृष्टी राहू दे.

चला तर गणपती बाप्पा मोर या।
पुढल्या वर्षी लवकर या।।
एक दोन तीन चार।
गणपतीचा जय जय कार।।

प्रत्येक भक्तांनी नदीच्या पाण्यामध्ये जास्तीत जास्त न जाता अलीकडेच गणपती विसर्जन करावे. वाहतूक करते वेळेस काळजी घ्यावी.

**-विठ्ठल बरसमवाड**
अध्यक्ष
विठू माऊली प्रतिष्ठान खैरकावाडी,
ता. मुखेड

# जिल्हा परिषद शाळा : राजकारणाच्या सावलीतून गुणवत्तेच्या प्रकाशाकडे

गावातील शाळा बंद पडते तेव्हा केवळ एक शाळा बंद होत नाही; त्या गावाच्या सामाजिक भविष्याचा एक दरवाजा बंद होण्याची भीती निर्माण होते. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ही ग्रामीण महाराष्ट्राच्या शैक्षणिक प्रवासातील अशीच एक महत्त्वाची संस्था आहे. गरीब शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, वंचित आणि मध्यमवर्गीय कुटुंबांतील लाखो मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे ऐतिहासिक कार्य या शाळांनी केले आहे. म्हणूनच आज जिल्हा परिषद शाळांबद्दल चर्चा करताना केवळ ङ्सरकारी शाळा चांगल्या की खासगी?फ्एवढ्यापुरता प्रश्न मर्यादित ठेवणे योग्य ठरणार नाही. त्यापेक्षा मोठा प्रश्न आहेमहाराष्ट्राच्या ग्रामीण मुलाला गुणवत्तापूर्ण, समान आणि भविष्याभिमुख शिक्षण देण्यासाठी जिल्हा परिषद शाळांचे पुढील रूप काय असावे? हा प्रश्न नांदेडपुरता नाही. तो संपूर्ण महाराष्ट्राचा आहे.राजकारण शाळेच्या दारात का येते?




जिल्हा परिषद हीच मुळात लोकशाहीच्या विकेंद्रीकरणाची संस्था आहे.ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांशी शाळा जोडलेल्या आहेत.त्यामुळे शाळेच्या विकासात लोकप्रतिनिधींचा सहभाग असणे स्वाभाविक आहे. शाळेला इमारत हवी, वर्गखोल्या हव्यात, स्वच्छतागृह हवे, पिण्याचे पाणी हवे, संरक्षणभिंत हवी, मैदान हवे, संगणक व डिजिटल साधने हवीतया गरजांसाठी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे पाठपुरावा करणे ही लोकशाहीतील सकारात्मक भूमिका ठरू शकते.मात्र प्रश्न तेव्हा निर्माण होतो, जेव्हा शाळेच्या शैक्षणिक निर्णयांपेक्षा व्यक्तीगत, गटगत किंवा पक्षीय हितसंबंध मोठे होतात. शिक्षकाची बदली कोणाच्या शिफारशीने होणार, कोणाला कुठे नियुक्ती मिळणार, कोणत्या शाळेला कोणती सुविधा मिळणार, कोणत्या शिक्षकावर कोणती कारवाई होणारया प्रश्नांमध्ये पारदर्शक नियमांपेक्षा राजकीय जवळीक महत्त्वाची ठरू लागली तर त्याची किंमत शेवटी विद्यार्थी मोजतो. म्हणूनच राजकारणाला शाळेपासून पूर्णपणे दूर ठेवण्यापेक्षा राजकीय हस्तक्षेप आणि लोकशाहीतील उत्तरदायित्व यांच्यात स्पष्ट सीमारेषा आखणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रात जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हांतर्गत व आंतरजिल्हा बदल्यांसाठी शासनाने धोरणे आणि त्यात वेळोवेळी सुधारणा केल्या आहेत. २८ मार्च २०२५ आणि १६ एप्रिल २०२५ रोजीही शिक्षकांच्या बदल्यांबाबत स्वतंत्र शासन निर्णय प्रसिद्ध झाले; विशेष संवर्गासंबंधी स्पष्टीकरणही १६ जून २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आले.याचा अर्थ एक महत्त्वाची गोष्ट स्पष्ट होतेशिक्षक बदली ही व्यक्तीच्या इच्छेवर किंवा स्थानिक राजकीय दबावावर चालणारी प्रक्रिया नसून धोरण, पात्रता, संवर्ग, सेवा व प्रशासकीय निकष यांच्या चौकटीत चालणारी प्रक्रिया असणे अपेक्षित आहे. तरीही प्रत्यक्ष जीवनात बदली हा शिक्षकांसाठी केवळ प्रशासकीय विषय राहत नाही.कुटुंब, मुलांचे शिक्षण, वृद्ध आई-वडील, पती-पत्नीचे वास्तव्य, आरोग्य, दुर्गम सेवा आणि प्रवास यांच्याशी तो जोडलेला असतो. म्हणून बदली धोरण नियमबद्धही असावे आणि मानवीही असावे.पारदर्शक ऑनलाइन प्रक्रिया, स्पष्ट निकष,सार्वजनिक गुणवत्ता/प्राधान्यक्रम आणि तक्रार निवारण यंत्रणा अधिक सक्षम करणे ही काळाची गरज आहे.

गेल्या काही वर्षांत शिक्षकांच्या कामाचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलले आहे. अध्यापनाबरोबर विविध प्रशासकीय कामे, ऑनलाइन माहिती, सर्वेक्षण, अहवाल, विविध उपक्रम आणि शासकीय योजनांची अंमलबजावणी यामुळे शिक्षकांच्या वेळेवर परिणाम होतो.याचा अर्थ शिक्षकांची उत्तरदायित्वाची भावना कमी करावी असा नाही.उलट शिक्षकांना अधिक शैक्षणिक स्वायत्तता आणि त्याचवेळी अधिक स्पष्ट उत्तरदायित्व दिले पाहिजे. शिक्षक वर्गात किती वेळ देतो, मुलांची वाचन-लेखन क्षमता किती वाढली, गणिती आकलन किती सुधारले, विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत काय बदल झाला, शाळेत नवोपक्रम किती झालेया परिणामांवर भर असणे अधिक महत्त्वाचे आहे.

आज अनेक ग्रामीण शाळांसमोर विद्यार्थीसंख्या कमी होण्याचे आव्हान आहे.त्यामागे स्थलांतर,लोकसंख्येतील बदल, पालकांची बदलती मानसिकता, इंग्रजी माध्यमाचे आकर्षण, खासगी शाळांची वाढ आणि काही ठिकाणी सरकारी शाळांबद्दल निर्माण झालेला अविश्वास अशी अनेक कारणे आहेत.फक्त ङ्पटसंख्या कमी आहे म्हणून शाळा बंद करा किंवा एकत्र कराफ हा उपाय पुरेसा नाही.पहिला प्रश्न असायला हवा-पालक सरकारी शाळेतून मुलाला का काढून घेत आहेत?दुसरा प्रश्नज्या सरकारी शाळेत विद्यार्थी टिकून आहेत, त्या शाळेच्या यशातून इतर शाळांनी काय शिकायचे?आणि तिसरा-गावातील जिल्हा परिषद शाळेला गावाच्या विकासाचे केंद्र कसे बनवायचे?या प्रश्नांची उत्तरे शोधल्याशिवाय केवळ आकडेवारीवर आधारित निर्णय ग्रामीण शिक्षणासाठी अपुरे ठरतील.

'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा'पुरते शाळेचे सौंदर्य मर्यादित नको, शाळेच्या भिंती रंगवल्या, परिसर स्वच्छ केला, सुंदर बाग तयार केली, डिजिटल फलक लावला म्हणजे शाळा सुंदर झाली, असे मानणे धोकादायक ठरू शकते.शाळेचे खरे सौंदर्य मुलाच्या डोळ्यातील जिज्ञासेत असते. ज्या शाळेत मूल सहजपणे पुस्तक वाचते, प्रश्न विचारते, प्रयोग करते, गणित समजून घेते, खेळते, गाणे म्हणते, चित्र काढते, संगणक वापरते आणि स्वतःच्या विचारांना शब्द देते ती शाळा खऱ्या अर्थाने सुंदर आहे.

२०२० मध्ये प्रवेश, समता, गुणवत्ता, परवडणारे शिक्षण आणि उत्तरदायित्व यांना महत्त्व दिले असून मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान, चिकित्सक विचार, समस्या सोडविण्याची क्षमता आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर यावर भर आहे. म्हणून महाराष्ट्रातील जिल्हा परिषद शाळांनी ङ्परीक्षा-केंद्रितफ्तेतून ङ्ज्ञान-केंद्रितफ्तेकडे जाणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात जिल्हा परिषद शाळा कुठे?आजच्या मुलासमोर मोबाईल, इंटरनेट, डिजिटल माध्यमे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचे जग उभे आहे. शहरातील मुलाला मिळणाऱ्या डिजिटल संधी आणि दुर्गम ग्रामीण मुलाला मिळणाऱ्या संधी यांच्यातील अंतर वाढले तर भविष्यातील सामाजिक विषमता अधिक तीव्र होऊ शकते. म्हणून जिल्हा परिषद शाळेत ख शिकविणे म्हणजे पहिलीच्या मुलाला गुंतागुंतीची तांत्रिक माहिती देणे नव्हे. तंत्रज्ञानाचा योग्य, सुरक्षित, सर्जनशील आणि जबाबदार वापर करण्याची संस्कृती बालपणापासून निर्माण करणे हा त्याचा उद्देश असावा.यासाठी डिजिटल साधने, शिक्षक प्रशिक्षण आणि स्थानिक भाषेतील गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सामग्री उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

शाळेच्या प्रश्नांवर राजकीय दबाव निर्माण करण्यापेक्षा पालक, ग्रामस्थ, माजी विद्यार्थी, शिक्षक आणि स्थानिक प्रशासन यांच्या सहभागातून निर्णय घेण्याची संस्कृती विकसित झाली पाहिजे.लोकप्रतिनिधींनी शाळेला निधी आणि सुविधा मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा; परंतु कोण शिक्षक असावा, कोणाची बदली कुठे व्हावी किंवा शैक्षणिक निर्णय कोणाच्या राजकीय पसंतीने घ्यावा, हा प्रश्न नियम आणि संस्थात्मक प्रक्रियेतून सुटला पाहिजे.यामुळे लोकप्रतिनिधींची भूमिका कमी होत नाही; उलट ती अधिक विधायक होते. खासगी शाळांशी स्पर्धा नव्हे, गुणवत्तेची शर्यत असावी.सरकारी आणि खासगी शाळांमध्ये संघर्ष उभा करण्याची गरज नाही.पालकांना आपल्या मुलासाठी योग्य शिक्षण निवडण्याचा अधिकार आहे. परंतु सरकारी शाळा ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांची अपरिहार्यता राहण्याऐवजी गुणवत्तेमुळे पालकांची पसंती बनली, तर त्यापेक्षा मोठे यश कोणते? सरकारी शाळेत प्रवेश घेणारा विद्यार्थी 'गरीब आहे म्हणून' नव्हे, तर 'ही शाळा चांगली आहे म्हणून' प्रवेश घेतो, अशी परिस्थिती निर्माण करणे हेच खरे उद्दिष्ट असले पाहिजे.

**उपाय काय?**-महाराष्ट्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांसाठी काही मूलभूत दिशांचा गांभीर्याने विचार व्हायला हवा.

१. सर्व शिक्षक,शासकीय कर्मचारी व लोकप्रतिनिधीचे मुलं सरकारी शाळेत घालण्याचा कायदा करावा. २. शिक्षक बदल्यांची पूर्ण पारदर्शक, नियमाधारित आणि शक्य तितकी स्वयंचलित प्रक्रिया. ३. शिक्षकांचा अध्यापनाबाहेरील अनावश्यक प्रशासकीय भार कमी करणे. ४. प्रत्येक शाळेसाठी मूलभूत सुविधास्वच्छ पाणी, स्वच्छतागृह, वीज, सुरक्षित इमारत, ग्रंथालय, क्रीडा साहित्य आणि डिजिटल साधने. ५. शाळेच्या गुणवत्तेचे मूल्यमापन केवळ पटसंख्या किंवा परीक्षेच्या गुणांवर न करता विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष शिकण्याच्या क्षमतेवर करणे. ६. उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षक आणि शाळांचे अनुभव इतर शाळांपर्यंत पोहोचविणे. ७. दुर्गम व अवघड क्षेत्रातील शिक्षकांसाठी प्रोत्साहनात्मक धोरण अधिक प्रभावी करणे. ८. एआय आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा स्थानिक भाषेत, वयानुरूप आणि सुरक्षित वापर. ९. पालक व माजी विद्यार्थ्यांना शाळेच्या विकासात सहभागी करून घेणे. १०. पटसंख्या कमी असलेल्या शाळांबाबत निर्णय घेण्यापूर्वी स्थानिक सामाजिक व भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करणे. ११. शाळेतील प्रत्येक निर्णयाचा अंतिम निकष'याचा विद्यार्थ्याला काय फायदा? ' हा असेल. शेवटी प्रश्न एका शाळेचा नाही, एका पिढीचा आहे. जिल्हा परिषद शाळा ही केवळ शासनाची मालमत्ता नाही. ती समाजाच्या करातून उभी राहिलेली सार्वजनिक शिक्षणव्यवस्था आहे. म्हणून तिच्या यशाची जबाबदारी शासनाची आहे, प्रशासनाची आहे, शिक्षकांची आहे, पालकांची आहे आणि समाजाचीही आहे.

राजकारण लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे.त्यामुळे शाळांपासून राजकारण पूर्णपणे वेगळे करणे शक्यही नाही आणि आवश्यकही नाही. मात्र शाळेचे राजकीयीकरण होऊ नये;शाळेच्या प्रश्नांचे लोकशाहीकरण व्हावे.लोकप्रतिनिधींनी सुविधा मिळवून द्याव्यात. प्रशासनाने नियम पाळावेत. शिक्षकांनी ज्ञानाची मशाल तेवत ठेवावी.पालकांनी शाळेवर विश्वास ठेवावा. समाजाने शाळेला आपले मानावे. आणि शासनाने एक गोष्ट लक्षात ठेवावीग्रामीण महाराष्ट्रातील मुलाच्या हातातील पुस्तक हे त्याच्या भवितव्याचे सर्वात मोठे राजकीय, सामाजिक आणि आर्थिक साधन आहे.

त्या पुस्तकाची पाने रिकामी राहू नयेत. कारण जिल्हा परिषद शाळा वाचविणे म्हणजे केवळ एक शासकीय संस्था वाचविणे नव्हे;ते महाराष्ट्राच्या ग्रामीण समाजाच्या पुढच्या पिढीला समान संधी देण्याचे काम आहे.आणि म्हणूनच आजची गरज आहे. 'राजकीय सावलीतील शाळा' नव्हे, 'लोकशाहीच्या प्रकाशातील गुणवत्तापूर्ण शाळा!'

**-पंडित पवळे,**
शिक्षणयोगी, नांदेड
मो.९८९०२३२९६२

# मंजुळ आवाजाचे पार्श्वगायक एस. पी. बालसुब्रमण्यम

हिंदी चित्रपटसृष्टीतील मंजुळ आवाजाचे पार्श्वगायक एस पी बालसुब्रमण्यम यांचा आज स्मृतिदिन. सहा वर्षापूर्वी २५ सप्टेंबर २०२० रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी एस पी बालसुब्रमण्यम यांचे कोरोनाने निधन झाले होते. त्यांच्या निधनाने रसिकांनी हळहळ व्यक्त केली होती कारण एस पी बालसुब्रमण्यम हे रसिकांचे आवडते पार्श्वगायक होते. त्यांचे निधन रसिकांना चटका लावून जाणारे ठरले.

एस. पी. बालसुब्रमण्यम यांचा जन्म ४ जून १९४६ रोजी आंध्रप्रदेश मधील नेल्लोर येथील मेहुआ या गावी झाला. त्यांचे पूर्ण नाव श्रीपती पंडितराध्युला बालसुब्रमण्यम असे होते. एस. पी. बालसुब्रमण्यम यांचे वडील हरिकथा गायक होते. आंध्रप्रदेश मधील हे पारंपरिक लोकसंगीत आहे त्यात कविता, कथा, गायन, नृत्य यासह सर्व प्रकारांचा समावेश असतो. एस. पी. बालसुब्रमण्यम यांचे वडील नाटकातही काम करत. एस पी यांना एक भाऊ व दोन बहिण आहेत. एस. पी. यांनी मोठे होऊन इंजिनिअर व्हावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती पण ती पूर्ण होऊ शकली नाही. एस. पी. बालसुब्रमण्यम यांना लहानपणापासूनच गायनाची आवड होती त्यामुळे त्यांनी गायनातच करिअर करायचे असे ठरवले आणि त्यांनी व्यावसायिक गायनास सुरुवात केली.

१९६४ साली त्यांना गायनात पहिले पारितोषिक मिळाले. त्यानंतर त्यांचे नाव सर्वदूर पोहचले.



सुरुवातीला त्यांनी आपल्या मातृभाषेत म्हणजे तेलगू भाषेत गाणी गायला सुरुवात केली नंतर त्यांनी तमिळ, मल्याळम आणि कन्नड या दक्षिण भारतीय भाषेतही गाणी गायला सुरुवात केली. दक्षिणात्य भाषेत त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लगली. त्याची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढू लागली. त्यांच्या मंजुळ आवाजाने रसिकांना वेड लावले. त्यांचा आवाज आणि त्यांनी गायलेली गाणी रसिकांना इतकी आवडली की रसिकांनी त्यांना दक्षिणेतील. मोहम्मद रफी अशी पदवी दिली.

दक्षिणेकडून त्यांनी आपला मोर्चा हिंदी चित्रपट सृष्टीकडे वळवला. हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केल्यावर त्यांना एक दुजे के लिये या चित्रपटात गाण्याची संधी मिळाली. या चित्रपटात त्यांनी गायलेली सर्व गाणी खूप गाजली. आजही या चित्रपटातील त्यांनी गायलेली गाणी प्रेक्षकांच्या ओठावर आहेत. या चित्रपटात त्यांनी गायलेले हम बने तुम बने एक दुजे के लिये.... या गाण्यासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. एस.पीं.च्या पहिल्याच चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याने त्यांचे नाव देशभर झाले. एस. पी. बालसुब्रमण्यम यांनी गायलेल्या पहिल्याच चित्रपटातील गाणी गाजल्याने त्यांना अनेक चित्रपटात गाण्याची संधी मिळाली. अनेक संगीतकार त्यांना आपल्याकडे गाणी गाण्यासाठी गळ घालू लागले.

पुढे त्यांनी अनेक चित्रपटात गाणी गायली, ती गाणी लोकप्रियही झाली. हिंदी चित्रपट सृष्टीत त्यांचे आता चांगले बस्तान बसले. पत्थर के फुल, बागी, हम आपके है कौन? साजन, रोजा या चित्रपटात त्यांनी गायलेली गाणी खूप गाजली. सलमान खानचा पहिला चित्रपट असलेल्या मैने प्यार किया या चित्रपटात त्यांनी सलमानचा आवाज बनून गाणी गायली. या चित्रपटात त्यांनी गायलेली सर्व गाणी खूप गाजली. सलमान खानला सुपरस्टार करण्यात एस. पी. बालसुब्रमण्यम यांचा मोलाचा वाटा होता असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

सलमान खानच्या अनेक गाण्यांना त्यांचाच आवाज होता. सलमान खान आणि एस. पी. हे जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू होते. १९९० च्या दशकात त्यांनी गायलेली सर्वच गाणी लोकप्रिय झाली. एस. पी. यांनी १६ भाषांमधून ४० हजारांहून अधिक गाणी गायली. ८ फेब्रुवारी १९८१ रोजी सकाळी ९ ते रात्री ९ अशा १२ तासात तब्बल २१ कन्नड गाणी रेकॉर्ड करून त्यांनी विश्वविक्रम केला जो गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंदला गेला. एस. पी. यांनी जवळपास पाच दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या आवाजाची मोहिनीच अशी होती की जो त्यांचा आवाज ऐकेल तो त्यांच्या प्रेमात पडेल. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. त्यांना तब्बल अर्धा डझन राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. शिवाय अनेक फिल्मफेअर, स्क्रीन पुरस्कार मिळाले.

भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरवले. रसिकांचे आवडते आणि रसिकांच्या मनात आदराचे स्थान असलेल्या या गायकाचे कोरोनाने अचानक निधन झाल्याने रसिकांना मोठा धक्का बसला होता. मंजुळ आवाजाचे जेष्ठ पार्श्वगायक एस. पी. बालसुब्रमण्यम यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी यश संपादन करावे -उपविभागीय अधिकारी विलास नरवटे

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात 'राष्ट्रीय सेवा योजना दिन' उत्साहात साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)–** शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी व शैक्षणिक योजनांची विद्यार्थ्यांनी सखोल माहिती करून घ्यावी. या योजनांचा योग्य लाभ घेत आपल्या शैक्षणिक व वैयक्तिक प्रगतीसाठी प्रयत्न करावेत आणि निश्चित ध्येय गाठून जीवनात उज्ज्वल यश संपादन करावे, असे आवाहन कंधारचे उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी विलास नरवटे यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात गुरुवार, दि. २४ सप्टेंबर, रोजी 'राष्ट्रीय सेवा योजना दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र संकुलातील सेमिनार हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी. डी. पवार होते. यावेळी मंचावर सामाजिकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. प्रमोद लोणारकर, डॉ. शालिनी कदम, डॉ. बाबुराव जाधव तसेच विशेष अतिथी म्हणून डॉ. वैजनाथ आनमुलवाड उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. पवार म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, सामाजिक जाणीव, श्रमप्रतिष्ठा आणि राष्ट्रनिर्मितीची भावना विकसित होते. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखून विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. मारुती गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यापीठ परिसर कार्यक्रम अधिकारी डॉ. नंदकुमार बोधगिरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार डॉ. नितीन गायकवाड यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सामाजिकशास्त्र संकुलातील डॉ. स्मिता नायर, डॉ. झिनत शेख, प्रा. ओंकार मठपती, डॉ. शिवाजी गायकवाड, डॉ. शंकर जाधव, डॉ. वसंत सोळुंके आणि प्रा. अतुल समिंद्रे यांनी विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यापीठातील विविध विभागांचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# नांदेडमध्ये खुनाचा प्रयत्न आणि मंदिरात घरफोडी; दोन स्वतंत्र गुन्हे दाखल




**नांदेड (प्रतिनिधी) –**शहरातील वजिराबाद पोलीस ठाणे हद्दीत किरकोळ कारणावरून एकावर प्राणघातक हल्ला तर दुसऱ्या घटनेत मंदिर फोडून चोरट्यांनी दानपेटीतील रक्कम लंपास केली. या दोन गंभीर गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.

मंगळवार, दि. २२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७.१५ वाजता सिद्धार्थ विद्यालयासमोर, देगावचाळ येथे आरोपी रोहित उर्फ सोनू गोडबोले, जब्बा उर्फ आदित्य हटकर, रोहन नवघडे, अजय थोरात (सर्व रा. देगाव चाळ) व इतरांनी संगनमत करून फिर्यादी मनोज प्रल्हाद माने (३२, सोमेश कॉलनी) आणि जखमी शंकर बबन माने यांना जुन्या भांडणाच्या कारणावरून तलवार व खंजरने मारहाण करून गंभीर जखमी केले व जीवे मारण्याची धमकी दिली.

याप्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४८८/२०२६ कलम १०९(१), ११८(१), ११५(२), ३५१(२), १८९, १९०, १९१(३) BNS सह कलम ४/२५, ४/२७ भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल असून तपास सपोनि लोंढे करीत आहेत.

दि. २३ सप्टेंबर रोजी पहाटे १.२० वाजता मार्कंडेय मंदिर येथे मंदिराच्या गेटचे कुलूप तोडून दानपेटीसह २० ते २५ हजार रुपयांची रोकड अज्ञात चोरट्याने चोरून नेली. फिर्यादी भास्कर नरसय्या तुम्मा (३६, गंगाचाळ) यांच्या तक्रारीवरून वजिराबाद ठाण्यात गु.र.नं. ४८९/२०२६ कलम ३३१(४), ३०५ भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल असून तपास पोउपनि गुट्टे करीत आहेत.

# डेंग्यू प्रतिबंधासाठी गावागावांत स्वच्छता उपाययोजना प्रभावीपणे राबवा

## सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनावर विशेष लक्ष देण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी) –**ग्रामीण भागात डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर स्वच्छताविषयक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी दिले आहेत. सांडपाणी व्यवस्थापन, घनकचऱ्याचे योग्य संकलन व विल्हेवाट तसेच घरगुती आणि सार्वजनिक परिसरात पाणी साचू न देण्यावर विशेष भर देण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय तसेच जलशक्ती मंत्रालयाच्या मार्गदर्शनानुसार जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये डेंग्यू प्रतिबंधासाठी आवश्यक स्वच्छता उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना गट विकास अधिकारी व ग्रामपंचायतींना देण्यात आल्या आहेत.

ग्रामपंचायत क्षेत्रातील घरगुती व सार्वजनिक ठिकाणांमधील सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन करून कुठेही डबकी किंवा पाणी साचणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच घरांच्या व सार्वजनिक परिसरातील कचरा, टाकाऊ वस्तू, प्लास्टिकच्या वस्तू, टायर, डबे आदींमध्ये पाणी साचून डासांची उत्पत्ती होणार नाही, यासाठी नियमित स्वच्छता करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

डेंग्यू प्रतिबंधासाठी नागरिकांमध्येही व्यापक जनजागृती करावी. पाणी साचू देऊ नका, डासांची उत्पत्ती होऊ देऊ नका हा संदेश घराघरांत पोहोचवून नागरिकांचा स्वच्छता उपक्रमांमध्ये सहभाग वाढवावा. सांडपाणी व घनकचऱ्यामुळे डासांची उत्पत्ती होणारी संभाव्य ठिकाणे शोधून त्यांचे निर्मूलन करण्यावर ग्रामपंचायतींनी विशेष लक्ष द्यावे.

यासाठी ग्रामपंचायत, स्वच्छ भारत मिशन आणि आरोग्य विभागाच्या यंत्रणांनी समन्वयाने काम करून डेंग्यू प्रतिबंधाच्या उपाययोजना प्रभावीपणे राबवाव्यात, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी केले आहे.

# नांदेड-बिदर रेल्वे मार्गासाठी प्रत्यक्ष भूसंपादनाची प्रक्रिया सुरु करा -खा. रवींद्र चव्हाण



**नांदेड (प्रतिनिधी)–**गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या नांदेड-बिदर या महत्त्वाकांक्षी रेल्वे मार्गासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करून प्रत्यक्ष भूसंपादनाची कार्यवाही सुरू करावी, शिवाय नांदेड जिल्ह्यातील रेल्वे प्रवाशांच्या विविध प्रलंबित मागण्या त्वरित मार्गी लावाव्यात, अशी मागणी खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी नवी दिल्ली येथे रेल्वे बोर्डाचे चेअरमन तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश कुमार यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी नांदेड जिल्ह्यातील रेल्वे सुविधा, प्रवाशांच्या समस्या आणि प्रलंबित रेल्वे प्रकल्पांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

निवेदनात अंडरपास ब्रीजमध्ये पावसाचे पाणी साचण्याची समस्या दूर करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, मुदखेड रेल्वे स्थानक परिसरात सब-वे निर्माण करावे, रायलसीमा एक्स्प्रेस नांदेड येथून सुरू करावी आणि हजूर साहेब रेल्वे स्थानकाचे नाव 'श्री हजूर साहेब रेल्वे स्टेशन' असे करण्याच्या मागणीसह अमृत भारत योजनेअंतर्गत सुरू असलेल्या रेल्वे स्थानकांच्या कामांचा दर्जा व प्रगती तपासण्यासाठी पाहणी समिती स्थापन करावी अशीही मागणी खासदार चव्हाण यांनी केली.

उमरी व धर्माबाद रेल्वे स्थानकांवर प्रवाशांच्या सोयीसाठी विविध महत्त्वाच्या रेल्वे गाड्यांना थांबा नाही, यामध्ये १७६०५ भगत की कोठी एक्स्प्रेस, एपीएन डाउन, १२७६५ अमरावती-तिरुपती एक्स्प्रेस, १७०२० हैदराबाद-जयपूर एक्स्प्रेस, १७२८८-१७२८९ तसेच नगरसोल-नरसापूर एक्स्प्रेस या गाड्यांचा समाववेश असून या सर्व गाड्यांना थांबा देण्याची मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

# इतवाऱ्यात पुन्हा गुटखा जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** गुटख्याचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांचा सुळसुळाट सुरूच आहे. काही दिवसांपूर्वीच पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या पथकाने इतवाऱ्यात तब्बल ४३ लाख ३३ हजार रुपयांचा गुटखा जप्त केला होता. या प्रकरणानंतर पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ यांना नियंत्रण कक्षात पाठवण्यात आले होते. या प्रकरणातील माफिया अकबर चाऊस आणि शेख समिर या दोघांना दोन दिवसांची पोलीस कोठडी मिळाली आहे. ही घटना ताजी असतानाच इतवारा पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने दुसरी कारवाई करत १ लाख रुपयांचा गुटखा जप्त केला आहे.

# ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील श्री गणेश विसर्जन दोन ठिकाणी, किवळा साठवण तलाव व नावघाट येथे मूर्ती संकलन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील शहरी व ग्रामीण भागातील सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाच्यावतीने बसविण्यात आलेल्या श्री मूर्ती विसर्जन २५ सप्टेंबर रोजी किवळा साठवण तलाव येथे होणार आहे. नावघाट वसरणी येथे लहान मूर्तींचे विसर्जन व संकलन करण्यात येणार आहे तर मनपाच्या वतीने मनपा सिडको क्षेत्रीय कार्यालय, महात्मा बसवेश्वर पुतळा नवीन कौठा येथे कृत्रिम तलाव व मूर्ती संकलन केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अनंत चतुर्दशी निमित्ताने ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील मोठ्या मूर्तीचे विसर्जन किवळा येथे तर लहान मूर्तीचे विसर्जन नावघाट वसरणी येथे करण्यात येणार असून, नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्यासह जिल्हाधिकारी डॉ.राहुल कर्डिले, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, सहायक आयुक्त डॉ. मिर्झा बेग व पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी पाहणी केली असून, विसर्जनासाठी क्रेन, जेसीबी, विद्युत लाईट, बॅरिकेटस, रस्त्यावरील खड्डे यासह आवश्यक त्या सुचना मनपा प्रशासनास दिल्या आहेत.

ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत ग्रामीण व शहरी यासह परवाना व विनापरवाना जवळपास दोनशे सार्वजनिक गणेश मंडळ यांनी नोंदणी केली असून सिडको हडको भागातील मुख्य रस्त्यावरून भव्य मिरवणूक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांनी आयोजित केली असून यावर्षी प्रथमच विना डिजे व ढोलताशांच्या व पारंपरिक वाद्यवृंदामध्ये सार्वजनिक गणेश मंडळ मिरवणूक काढण्यात येणार आहेत.

# नांदेड पोलिसांची जुगार अड्ड्यांवर दुहेरी कारवाई; २० आरोपींवर गुन्हे, दीड लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–**पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने अवैध धंद्यांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत जिल्ह्यात दोन ठिकाणी जुगार अड्ड्यांवर छापे टाकण्यात आले. या कारवाईत एकूण २० आरोपींवर गुन्हे दाखल करून सुमारे १ लाख ७७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

बुधवार, दि. २३ सप्टेंबर रोजी इतवारा गुन्हे शोध पथकाला गाडीपुरा येथे हरीसिंग चौधरी यांच्या घरात तिर्रट जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली. पोलीस उपनिरीक्षक जळबाजी गायकवाड यांच्या पथकाने छापा टाकून ८ जणांना ताब्यात घेतले. ताब्यात घेण्यात आलेल्यांमध्ये भीमराव काशीराम धमने, वय ५६ वर्षे, नांदेड, माधव हौसाजी आरसुलवाड, वय ५४ वर्षे रा. पाताळगंगा ता. कंधार जि. नांदेड ह.मु. कौठा, नांदेड, फहीम खान विजुला खान वय ५२ वर्षे रा. चौफाळा नांदेड, मोहम्मद सुभान मोहम्मद खाजा, वय ५५ वर्ष रा. ईदगा रोड खुदबे नगर, नांदेड, राजू पदमाकर भोसले, वय ४१ वर्ष रा. कोरका पिपळगाव ता.जि. नांदेड, विक्की ऊर्फ विकेश पृथ्वीराज सोनकांबळे, वय ४२ वर्षे रा.इतवारा, बाजार, नांदेड, सम्यद अलीओदीन सय्यद रहीमोदीन वय ५० वर्षे रा. गाडीपुरा, नांदेड आणि मोहम्मद सिराज मोहम्मद सल्लाउदीन, वय ४९ वर्षे रा. रहेमत नगर देगलुर नाका, नांदेड यांचा समावेश आहे. तर घरमालक हरीसिंग चौधरी फरार झाला आले.

# पूजा मोरे यांना पीएच.डी.पदवी प्रदान



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या भाषा आणि साहित्य संकुलातील मराठी विभागाच्या संशोधिका पूजा संजय मोरे यांना मराठी विषयातील विद्यावाचस्पती पदवी घोषित करण्यात आली आहे. त्यांनी आपला शोधप्रबंध मराठवाड्यातील ग्रामीण कथात्मक वाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ इ.स. २००५ ते २०१५) या विषयावर सादर केला होता.

सदर संशोधनासाठी त्यांना भाषा आणि साहित्य संकुलाचे संचालक तथा मराठी विभागाचे प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर यांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले.

# दिगंबरराव धर्माधिकारी यांच्या स्मरणार्थ आयोजित व्याख्यानमालेला प्रतिसाद

**बरबडा (प्रतिनिधी)–** कै. ह. भ. प. दिगंबरराव धर्माधिकारी बरबडेकर यांच्या २५ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त २१ सप्टेंबर रोजी जवाहरलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बरबडा येथे व्याख्यानमाला घेण्यात आली.

यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. गोविंदराव शिंदे, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे माजी प्राचार्य तथा संस्थेचे ज्येष्ठ संचालक व्ही.टी. सुरेवाड यांची उपस्थिती होती. या व्याख्यानमालेला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, उपाध्यक्ष सदाशिवराव धर्माधिकारी, ज्येष्ठ संचालक शिवाजीराव धर्माधिकारी, विद्यालयाचे प्राचार्य तथा सहसचिव सुदर्शन धर्माधिकारी, पद्माकर गुरूजी पंचलिंग, युवा नेते बलराज धर्माधिकारी, उपमुख्याध्यापक गणेश बडुरे, पर्यवेक्षक फड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुदर्शन धर्माधिकारी यांनी केले. कै. दिगंबरराव धर्माधिकारी पुण्यस्मरण दिनानिमित्त विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांची पवित्र पोर्टलद्वारे



शिक्षकपदी निवड झालेल्या शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. विद्यालयाचे उपमुख्याध्यापक गणेश बडुरे व सहशिक्षक पचलिंग एस. पी. यांना महात्मा ज्योतीराव फुले शिक्षण परिषदेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल त्यांचा व ज्युनियर कॉलेजचे प्रा. व्यंकटेश सोळंके यांच्या अरसड कांदबरीची निवड बी. रघुनाथ पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना बडुरे, सोळंके, अक्कलवाड, अमोल विठ्ठलकर, संजय पाटील मंगनाळे, संतोष पंचलिंग यांनी कै. दिगंबरराव धर्माधिकारी यांनी गोरगरिबांसाठी केलेल्या शैक्षणिक वाटचालीवर प्रकाश टाकला. अभिवादन म्हणून अभंग गाऊन मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन. टी. तिप्पलवाड यांनी केले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने करण्यात आली.

# १ ऑक्टोबरला फेस्कॉमची 'रिकामे ताट-वाटी-तांब्या' पदयात्रा; ज्येष्ठांनी शासकीय सत्कारावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–**जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त १ ऑक्टोबर रोजी फेस्कॉम उत्तर मराठवाडा विभागाच्या वतीने नांदेडमध्ये लक्षवेधी 'रिकामे ताट-वाटी-तांब्या' पदयात्रा आणि जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्रतिकात्मक अन्न-पाणी त्याग आंदोलन करण्यात येणार आहे.

फेस्कॉमचे अध्यक्ष डॉ. हंसराज वैद्य यांनी माहिती दिली की, जिल्ह्यातील १३६० ज्येष्ठ नागरिक संघांचे हजारो सदस्य या आंदोलनात सहभागी होणार आहेत.

शासनाने १ ऑक्टोबर रोजी आयोजित केलेल्या कोणत्याही सत्कार सोहळ्याला ज्येष्ठ नागरिकांनी उपस्थित राहू नये आणि सत्कार, मिष्टान्न किंवा अल्पोपहार स्वीकारू नये, असे आवाहन डॉ. वैद्य यांनी केले आहे. प्रथम गरीब, गरजवंत ज्येष्ठांच्या रिकाम्या ताटात मानधन टाका, भीक म्हणून नव्हे तर हक्क म्हणून द्या, ही आमची प्रमुख मागणी आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या ३ प्रमुख मागण्या - संपूर्ण करमुक्ती व ५ हजार मानधन, पेन्शन आणि व्याजावर कर नको. शेजारील राज्यांप्रमाणे पात्र गरीब ज्येष्ठांना दरमहा ५ हजार रुपये मानधन देण्यात यावे.

मूलभूत सुविधा: सर्वोच्च न्यायालयाच्या २०१८-१९ च्या निकालानुसार सन्मानाने जगणे हा हक्क आहे. जिल्ह्याच्या ठिकाणी ज्येष्ठ नागरिक भवन, तालुका आणि प्रभाग स्तरावर विरंगुळा केंद्र, संपूर्ण मोफत आरोग्य कवच, एसटी/रेल्वे प्रवास मोफत व आरक्षित आणि हेल्पलाईन सुविधा द्यावी.

मृत्यूनंतर २५ हजार सहाय्य: निराधार ज्येष्ठांच्या अंत्यविधीसाठी कुटुंबाकडे पैसे नसतात. त्यामुळे मृत्यूनंतर वारसाला २५ हजार रुपये अंत्यसंस्कार सहाय्य तात्काळ द्यावे, ज्येष्ठ नागरिकांचे वय ६० वर्ष ग्राह्य धरावे, त्यांना 'राष्ट्रीय संपत्ती' म्हणून घोषित करावे, 'मुख्यमंत्री लाडके मायबाप योजना' सुरू करून आधार कार्डवर ५ हजार मानधन द्यावे, स्वतंत्र मंत्रालय आणि आयोग स्थापन करावा, तसेच २००७ च्या कायद्याची अंमलबजावणी करावी. १ ऑक्टोबरपूर्वी मंत्रिमंडळाने याबाबत जी.आर. काढावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

# नांदेड विभागात आरपीएफ स्थापना दिवस उत्साहात साजरा




**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील सर्व ८ आरपीएफ पोस्ट, ८ आऊट पोस्ट तसेच मुख्यालयात वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्त दीपचंद्र आर्य यांच्या मार्गदर्शनाखाली रेल्वे सुरक्षा दलाचा स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने सर्व पोस्ट, आऊट पोस्ट व रेल्वे परिसरात जनजागृती, कल्याणकारी, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन व समाजाभिमुख विविध उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांमध्ये आरपीएफ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून 'सुरक्षा, सेवा आणि मानवता' या मूलभूत भावनेचे दर्शन घडविले.

नांदेड रेल्वे स्थानकावर 'Run for Raising Day', वृक्षारोपण, श्रमदान व प्रवासी जनजागृती असे उपक्रम घेण्यात आले. "Run for Raising Day' च्या माध्यमातून कर्मचाऱ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, संघभावना व परस्पर सौहार्द वाढीस प्रोत्साहन देण्यात आले. वृक्षारोपणाद्वारे पर्यावरण संवर्धन व हरित परिसराचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

आरपीएफ पोस्ट, बॅरॅक्स व रेल्वे स्थानक परिसरात श्रमदान कार्यक्रम घेण्यात आला. यात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वच्छता, साफसफाई व परिसराच्या देखभालीत सक्रिय सहभाग घेतला. तसेच प्रवाशांमध्ये स्वच्छता, रेल्वे सुरक्षा व सुरक्षित प्रवासाबाबत जनजागृती करण्यात आली.

सर्व पोस्ट व आऊट पोस्ट येथे ड्रग्जविरोधी जनजागृती अभियान राबविण्यात आले. रेल्वे प्रवासादरम्यान ड्रग्जच्या धोक्यांबाबत व सतर्क राहण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे लेव्हल क्रॉसिंग गेट सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेऊन वाहनचालक व नागरिकांना रेल्वे फाटक ओलांडताना घ्यावयाची काळजी व सुरक्षा नियमांचे पालन याबाबत जागरूक करण्यात आले.

याशिवाय मानव तस्करीविरोधी जनजागृती कार्यक्रम आयोजित करून प्रवासी व नागरिकांना मानव तस्करीच्या धोक्यांबाबत माहिती देण्यात आली. संशयास्पद हालचालींबाबत सतर्क राहून माहिती तात्काळ संबंधित यंत्रणेला देण्याचे आवाहन करण्यात आले.

या विविध उपक्रमांमधून प्रवासी सुरक्षा, जनजागृती, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि समाजकल्याणाप्रती नांदेड विभाग आरपीएफची कटिबद्धता दिसून आली.

वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्त दीपचंद्र आर्य यांनी कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागाचे व समर्पित कार्याचे कौतुक केले. त्यांच्या सहभागामुळे स्थापना दिवसाचे कार्यक्रम अधिक अर्थपूर्ण व प्रभावी ठरले असून 'सुरक्षा, सेवा आणि मानवता' या ध्येयाला अधिक बळ मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

# शिवरोडवर पहाटे पोलिसांचा छापा; 'तिर्रट' जुगार खेळणारे ६ जण जाळ्यात, ३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–**शहरातील शिवरोड परिसरात भररस्त्यात सुरू असलेल्या 'तिर्रट' जुगारावर भाग्यनगर पोलिसांनी बुधवार, दि. २३ सप्टेंबरच्या पहाटे धाड टाकली. या कारवाईत ६ जुगाऱ्यांना रंगेहात ताब्यात घेऊन ३ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने भाग्यनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी आपल्या गुन्हे शोध पथकाला पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांविरुद्ध विशेष मोहीम राबवून गुन्हेगारांना अटक करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर गुन्हे शोध पथक पेट्रोलिंग करत असताना संकेतनगर पाटीजवळ सार्वजनिक रस्त्यावर लाईटच्या उजेडात जुगार सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी दोन पंचांसमक्ष छापा टाकला असता ६ जण पैशांची बाजी लावून जुगार खेळताना आढळले.

ताब्यात घेतलेले आरोपी : दीपक सुभाष येवतीकर (वय ३०, निलेश्वरी कॉलनी), विनोद किशनराव खांडरे (वय ३९, स्वस्तिकनगर), ओंकार बालाजी बैनवाड (वय २७, मंत्रीनगर), सचिन अशोक नागरगोजे (वय ४५, निलेश्वरी कॉलनी), शशांक लक्ष्मण गबाळे (वय २४, निलेश्वरी कॉलनी) आणि विनायक मधुकर मिरकुटे (वय २६, खंडोबा चौक, नांदेड).

त्यांच्याकडून ६ हजार ९३० रुपये रोख, ६ मोबाईल, ३ दुचाकी आणि जुगाराचे पत्ते असा एकूण ३ लाख ६ हजार ९३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५४४/२०२६, कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विनोद देशमुख आणि त्यांच्या पथकाने केली.

# नांदेड-संतरागाछी साप्ताहिक रेल्वेगाडीची फेरी २८ रोजी रद्द

**नांदेड (प्रतिनिधी) –**चक्रधरपूर विभागातील बंडामुंडा केबिन ते राऊरकेला विभागादरम्यान ५ व्या रेल्वे मार्गाच्या कमिशनिंगसाठी नॉन-इंटरलॉकिंग काम हाती घेण्यात येणार आहे. या कामाच्या पार्श्वभूमीवर दक्षिण पूर्व रेल्वेकडून काही रेल्वेगाड्यांच्या फेऱ्या रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यानुसार नांदेड विभागातून धावणाऱ्या खालील साप्ताहिक रेल्वेगाड्यांची एक फेरी रद्द करण्यात आली आहे. रेल्वेगाडी क्रमांक १२७६७, हजूर साहिब नांदेड संतरागाछी साप्ताहिक रेल्वेगाडी २८ सप्टेंबर २०२६ रोजीची फेरी रद्द.

रेल्वेगाडी क्रमांक १२७६८, संतरागाछी हजूर साहिब नांदेड साप्ताहिक रेल्वेगाडी ३० सप्टेंबर २०२६ रोजीची फेरी रद्द. प्रवाशांनी या कालावधीत प्रवासाचे नियोजन करताना रेल्वेगाडीच्या वेळापत्रकाची व उपलब्ध पर्यायी रेल्वेसेवांची माहिती तपासून प्रवास करावा, असे आवाहन नांदेड विभाग, दक्षिण मध्य रेल्वेकडून करण्यात आले आहे.

# अंतर्मन



# करवा चौथचा मुहूर्त

## यंदा गौरी योगाचा संयोग; जाणून घ्या तारीख, महत्त्व अन् पूजा विधी...

**विवाहित महिला पतीच्या दीर्घायुष्यासाठी करवा चौथचे व्रत करतात. अविवाहित तरुणीही इच्छित पती मिळावा, या कामनेसाठी हे व्रत करतात. या दिवशी करवा माता आणि भगवान गणेशाची पूजा करण्याची परंपरा आहे. यंदा करवा चौथच्या दिवशी गौरी योगाचा संयोग असल्याचे ज्योतिषीय गणनेनुसार सांगितले जात आहे.**

### कार्तिक चतुर्थी तिथीचे वेळापत्रक

» चतुर्थी तिथी प्रारंभ : २८ ऑक्टोबर, रात्री १ वाजून ७ मिनिटांनी
» चतुर्थी तिथी समाप्त : २९ ऑक्टोबर, रात्री १० वाजून ११ मिनिटांनी



दरवर्षी कार्तिक महिन्यातील कृष्ण पक्षातील चतुर्थीला करवा चौथचे व्रत केले जाते. यंदा हे व्रत २९ ऑक्टोबर २०२६ रोजी केले जाणार आहे. कार्तिक चतुर्थी तिथीचा प्रारंभ २८ ऑक्टोबर रोजी रात्री १ वाजून ७ मिनिटांनी होईल. ही तिथी २९ ऑक्टोबर रोजी रात्री १० वाजून ११ मिनिटांपर्यंत राहील. उदय तिथीच्या नियमानुसार करवा चौथचे व्रत २९ ऑक्टोबरलाच केले जाईल. यंदा करवा चौथच्या दिवशी परिधी योगाचा संयोग असल्याचेही सांगितले जात आहे. तसेच चंद्राचा वृषभ राशीत प्रवेश होणार असून, गौरी योगाचाही संयोग असल्याचे ज्योतिषीय गणनेत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या दिवशी व्रत आणि पूजा करणे शुभ मानले जाते.

### करवा चौथ व्रताचे महत्त्व

धार्मिक मान्यतेनुसार करवा चौथच्या व्रताला विशेष महत्त्व आहे. या दिवशी माता पार्वतीची पूजा केल्याने अखंड सौभाग्य प्राप्त होते, अशी श्रद्धा आहे. करवा माता आणि भगवान गणेशाचीही पूजा केली जाते. करवा चौथच्या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान करून व्रताचा संकल्प केला जातो. यानंतर महिला सोळा शृंगार करतात. सायंकाळी करवा माता आणि भगवान गणेशाची पूजा करून करवा चौथची कथा ऐकली जाते. त्यानंतर चंद्रोदयाची प्रतीक्षा केली जाते. चंद्रदर्शन झाल्यानंतर चंद्राला अर्घ्य अर्पण करून पूजा केली जाते. त्यानंतर पतीचे दर्शन घेऊन आणि पूजा पूर्ण करून व्रत सोडण्याची परंपरा आहे.



# पितृपक्ष : पूर्ण विधी-विधान शक्य नसेल तर अशा प्रकारे करा पितरांचे स्मरण!

**हिंदू धर्मपरंपरेत पितृपक्षाला विशेष महत्त्व आहे. या काळात पूर्वजांचे स्मरण करून त्यांच्या आत्मशांतीसाठी श्राद्ध, तर्पण आणि दानधर्म केला जातो. धार्मिक मान्यतेनुसार, श्रद्धेने केलेल्या श्राद्धकर्मामुळे पितर प्रसन्न होऊन कर्त्याला आयुष्य, आरोग्य, यश, सुख, समृद्धी आणि धनधान्याची वृद्धी यासाठी आशीर्वाद देतात. मात्र प्रत्येकाला पूर्ण विधी-विधानानुसार श्राद्धकर्म करणे शक्य असेलच असे नाही. आर्थिक अडचणी किंवा अन्य कारणांमुळे श्राद्धकर्म करता येत नसेल, तरी आपल्या क्षमतेनुसार आणि श्रद्धेने पितरांचे स्मरण करता येते, अशी धार्मिक मान्यता आहे.**



» सूर्याला नमस्कार करून पितरांचे स्मरण : धार्मिक मान्यतेनुसार, सूर्यदेवाच्या माध्यमातून पितरांपर्यंत श्रद्धा आणि भावना पोहोचतात. त्यामुळे श्राद्धकर्मासाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध नसल्यास सकाळी सूर्यदेवाला नमस्कार करून मनोभावे प्रार्थना करता येते. 'पितरांचे श्राद्ध करण्यासाठी आवश्यक साधनसामग्री आणि सामर्थ्य माझ्याकडे नाही. त्यामुळे माझ्या भावना आणि श्रद्धेने केलेला नमस्कार पितरांपर्यंत पोहोचावा आणि त्यांना शांती मिळावी,' अशा भावनेने प्रार्थना करावी, अशी धार्मिक परंपरा सांगते. तसेच पितरांच्या निमित्ताने गरजूंना अन्नदान करणे, गायीला चारा देणे किंवा पाण्यात काळे तीळ अर्पण करून तर्पण करणे यासारखे उपायही केले जातात.

» घरच्या घरी साध्या पद्धतीने करा पितरांचे स्मरण : परिस्थितीमुळे श्राद्धकर्मासाठी बाहेर जाणे शक्य नसल्यास घरात स्वच्छ ठिकाणी दिवा लावून पितरांचे स्मरण करता येते. त्यांच्या नावाने जल अर्पण करून कुटुंबाच्या सुख-शांतीसाठी तसेच पितरांच्या आत्मशांतीसाठी प्रार्थना करावी. आपल्या क्षमतेनुसार अन्नदान, गरजू व्यक्तीला मदत किंवा समाजोपयोगी सेवा करण्याचा संकल्पही करता येतो. धार्मिक परंपरेनुसार, श्राद्धकर्मातील बाह्य आडंबरापेक्षा श्रद्धा, कृतज्ञता आणि पितरांप्रती असलेली भावना महत्त्वाची मानली जाते.

» पौर्णिमेचे श्राद्ध कधी करावे? : आश्विन महिन्यातील कृष्ण पक्षाच्या प्रतिपदेपासून अमावस्येपर्यंतचा काळ पितृपक्ष म्हणून पाळला जातो. या काळात अनेकजण आपल्या पूर्वजांच्या स्मरणार्थ श्राद्ध, तर्पण आणि दानधर्म करतात. ज्या व्यक्तींचे पूर्वज पौर्णिमेच्या दिवशी दिवंगत झाले आहेत, त्यांचे श्राद्ध पितृपक्ष सुरू होण्याच्या एक दिवस आधी करण्याची परंपरा आहे. त्यामुळे पौर्णिमेला मृत्यू झालेल्या पूर्वजांसाठी श्राद्धकर्म महालय सुरू होण्याच्या आदल्या दिवशी केले जाते, अशी धार्मिक मान्यता आहे.

### सामर्थ्य नसेल तर कसे करावे श्राद्धकर्म?

धार्मिक परंपरेनुसार, पितरांच्या स्मरणासाठी मोठा खर्च किंवा विशेष तयारी आवश्यक नाही. श्रद्धा आणि भावना यांना अधिक महत्त्व दिले जाते. आपल्या क्षमतेनुसार काही उपाय करता येतात. जल, काळे तीळ आणि दर्भाच्या साहाय्याने तर्पण करून पितरांचे स्मरण करावे. पितरांचे स्मरण करून त्यांच्या आत्मशांतीसाठी मनोभावे प्रार्थना आणि संकल्प करावा. शक्य असल्यास गरजू व्यक्तीला भोजन द्यावे किंवा आपल्या क्षमतेनुसार अन्नदान करावे. काही कुटुंबांत गाय, कुत्रा, कावळा आदींसाठी भोजन काढून ठेवण्याची परंपरा आहे. आर्थिक परिस्थिती अनुकूल नसल्यास कर्ज काढून, मोठा खर्च करून किंवा दिखावा करून श्राद्ध करण्याची आवश्यकता नाही. आपल्या क्षमतेनुसार गरजू व्यक्तीला मदत करणे किंवा अन्नदान करणे यालाही धार्मिक परंपरेत महत्त्व दिले जाते.

# पितृपक्ष सुरू होण्यापूर्वी घरातून 'या' वस्तूंना काढा आधी बाहेर...



**पूर्वजांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पितृपक्षाला हिंदू धर्मपरंपरेत विशेष महत्त्व आहे. यंदा २६ सप्टेंबरपासून पितृपक्षाला सुरुवात होणार आहे. या काळात श्राद्ध, तर्पण आणि अन्य धार्मिक विधी केले जातात. धार्मिक मान्यतेनुसार, पितृपक्षात पूर्वजांचे स्मरण करून त्यांच्यासाठी प्रार्थना केली जाते. वास्तुशास्त्राच्या मान्यतेनुसार, पितृपक्ष सुरू होण्यापूर्वी घराची स्वच्छता करून अनावश्यक आणि नकारात्मक वातावरण निर्माण करणाऱ्या वस्तू दूर करणे योग्य मानले जाते. घरातील अव्यवस्था कमी करून स्वच्छ आणि प्रसन्न वातावरण निर्माण केल्याने सकारात्मकता वाढण्यास मदत होते. पितृपक्षापूर्वी घराची तयारी करताना कोणत्या वस्तू काढून टाकाव्यात, जाणून घेऊया...**

» खंडित मूर्ती आणि फाटलेल्या धार्मिक प्रतिमा : वास्तुशास्त्रीय मान्यतेनुसार, घरातील देवघरात किंवा अन्य ठिकाणी खंडित मूर्ती ठेवू नयेत. त्याचप्रमाणे फाटलेल्या किंवा खराब झालेल्या धार्मिक प्रतिमाही घरात ठेवणे टाळावे. अशा वस्तूंचे धार्मिक पद्धतीनुसार विसर्जन किंवा योग्य प्रकारे विल्हेवाट लावावी.

» बंद पडलेली घड्याळे : घरातील बंद पडलेली किंवा खराब झालेली घड्याळेही काढून टाकावीत किंवा ती दुरुस्त करून घ्यावीत, असे वास्तुशास्त्रात मानले जाते. बंद घड्याळामुळे घरातील सकारात्मक वातावरणावर परिणाम होतो आणि प्रगतीत अडथळे निर्माण होतात, अशी वास्तुशास्त्रीय धारणा आहे.

» तुटलेली किंवा चिरलेली भांडी : श्राद्ध किंवा तर्पणाच्या वेळी स्वच्छतेला विशेष महत्त्व दिले जाते. त्यामुळे घरातील तुटलेली, चिरलेली किंवा खराब झालेली भांडी वापरणे टाळावे. अशी भांडी घरात नकारात्मकता आणि दारिद्र्य आणतात, अशी वास्तुशास्त्रीय मान्यता आहे. विशेषतः पितरांसाठी नैवेद्य किंवा भोजन तयार करताना स्वच्छ आणि व्यवस्थित भांड्यांचा वापर करावा.

» गंजलेल्या लोखंडी वस्तू : वास्तुशास्त्रानुसार, घरातील लोखंडी किंवा अन्य धातूच्या वस्तूंना गंज लागला असल्यास त्या स्वच्छ कराव्यात किंवा आवश्यक नसल्यास घरातून काढून टाकाव्यात. गंजलेल्या वस्तूंमुळे घरातील वातावरणावर नकारात्मक परिणाम होतो, अशी वास्तुशास्त्रीय धारणा आहे.

» सुकलेली आणि कोमेजलेली झाडे : घरात सुकलेली किंवा पूर्णपणे कोमेजलेली झाडे ठेवणे टाळावे. वास्तुशास्त्रानुसार, अशी झाडे नकारात्मकतेचे प्रतीक मानली जातात. त्यामुळे पितृपक्ष सुरू होण्यापूर्वी घरातील सुकलेली झाडे आणि पाने काढून टाकावीत. त्याऐवजी घरात हिरवीगार, निरोगी आणि जिवंत रोपे लावून परिसर स्वच्छ व प्रसन्न ठेवावा.

### पितृपक्षापूर्वी घराची स्वच्छता महत्त्वाची


**पितृपक्षाच्या पार्श्वभूमीवर घरातील अनावश्यक वस्तू, कचरा आणि अव्यवस्था दूर करून घर स्वच्छ ठेवावे. देवघर तसेच घरातील धार्मिक वस्तूंची स्वच्छता करावी. श्राद्ध, तर्पण किंवा अन्य धार्मिक विधी करताना परिसर स्वच्छ आणि शांत ठेवण्यावर भर द्यावा. हे उपाय वास्तुशास्त्र आणि धार्मिक मान्यतांवर आधारित आहेत. त्यांना वैज्ञानिक तथ्य म्हणून पाहू नये. कुटुंबाची परंपरा आणि श्रद्धेनुसार आचरण करावे.**

## नीम करोली बाबांची अद्भूत कथा

# काही केल्या गाडी सरकेना पुढे...

**नीम करोली बाबा हे भारतातील प्रसिद्ध संतांपैकी एक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या जीवनाशी संबंधित अनेक कथा आजही भक्तांमध्ये सांगितल्या जातात. त्यापैकीच एक कथा रेल्वेगाडीशी संबंधित आहे. एका प्रवासादरम्यान बाबांना प्रथम श्रेणीच्या डब्यातून खाली उतरवण्यात आले. त्यानंतर रेल्वेगाडी पुढेच सरकली नाही, अशी ही कथा आहे.**

भक्तांच्या श्रद्धेनुसार, या घटनेत बाबांच्या अद्भूत शक्तीचे दर्शन झाले. मात्र ही घटना प्रामुख्याने भक्तपरंपरेत सांगितली जाणारी आख्यायिका म्हणून पाहिली जाते. कथेनुसार, एकदा नीम करोली बाबा रेल्वेच्या प्रथम श्रेणीच्या डब्यात जाऊन बसले. काही वेळाने तिकीट तपासणीस तेथे आले. प्रथम श्रेणीच्या डब्यात बाबांना पाहून त्यांनी राग व्यक्त करत रेल्वेची साखळी ओढून गाडी थांबवली आणि बाबांना डब्यातून खाली उतरवले. त्यानंतर बाबा रेल्वेमार्गाजवळील एका झाडाखाली जाऊन बसले. हे ठिकाण नीम करोली गावाजवळ असल्याचे सांगितले जाते.



### बाबा उतरताच गाडी पुढे जाईना

दरम्यान, रेल्वेगाडी पुढे नेण्यासाठी गार्डने शिट्टी वाजवून हिरवा झेंडा दाखवला. चालकाने इंजिन सुरू करण्याचा प्रयत्न केला; मात्र गाडी जागची हलली नाही. चालकाने अनेकदा प्रयत्न करूनही गाडी पुढे सरकली नाही. त्यानंतर गाडी ओढण्यासाठी दुसरे इंजिनही आणण्यात आले. मात्र त्यानंतरही रेल्वेगाडी जागची हलली नाही, अशी या कथेतील माहिती आहे. कथेनुसार, त्या रेल्वेगाडीत एका स्थानिक इंग्रज दंडाधिकाऱ्याचाही प्रवास सुरू होता. परिस्थिती लक्षात आल्यानंतर त्यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना बाबांकडे जाऊन त्यांची क्षमा मागण्यास आणि त्यांना पुन्हा गाडीत बसण्याची विनंती करण्यास सांगितले. यानंतर काही रेल्वे अधिकारी आणि प्रवासी फळे व मिठाई घेऊन बाबांकडे गेले. त्यांनी बाबांना पुन्हा रेल्वेगाडीत बसण्याची विनंती केली. कथेनुसार, बाबांनी त्यांची विनंती मान्य केली; मात्र दोन अटी ठेवल्या. पहिली अट म्हणजे नीम करोली गावाजवळ रेल्वे स्थानक उभारण्यात यावे, जेणेकरून गावकऱ्यांना अनेक मैल पायी चालत रेल्वे स्थानक गाठावे लागू नये. दुसरी अट म्हणजे साधू-संतांशी आदराने आणि उदारतेने वागण्यात यावे. रेल्वे अधिकाऱ्यांनी दोन्ही अटी मान्य केल्याचे सांगितले जाते. त्यानंतर बाबा पुन्हा रेल्वेगाडीत जाऊन बसले.

### 'चला, घेऊन चला' म्हणताच गाडी सुरू झाली!

बाबा गाडीत परतल्यानंतर प्रवाशांनी त्यांना गाडी सुरू करण्यास सांगितले. त्यावर बाबा सहजपणे म्हणाले, "माझ्याकडे असे काय आहे की मी गाडी चालवू?" त्यावर चालकाने, बाबांच्या आदेशाशिवाय गाडी पुढे जात नसल्याचे सांगितल्याचे या कथेत नमूद केले जाते. त्यानंतर बाबांनी सहजपणे "चला, घेऊन चला," असे म्हटले. कथेनुसार, त्यानंतर रेल्वेगाडी पुढे निघाली. नीम करोली बाबांच्या भक्तांमध्ये हा प्रसंग आजही सांगितला जातो. भक्त या घटनेकडे बाबांच्या आध्यात्मिक सामर्थ्याबरोबरच सामान्य लोकांच्या सोयीचा विचार करणाऱ्या त्यांच्या लोककल्याणाच्या भावनेचे उदाहरण म्हणून पाहतात. रेल्वेगाडी थांबण्याची घटना भक्तपरंपरेत सांगितल्या जाणाऱ्या कथनावर आधारित आहे. तिची स्वतंत्र ऐतिहासिक किंवा वैज्ञानिक पुष्टी उपलब्ध असल्याचे या कथेत नमूद केलेले नाही.

### भगवान हनुमानाचे निस्सीम भक्त

नीम करोली बाबा हे विसाव्या शतकातील भारतातील प्रसिद्ध आध्यात्मिक संत आणि हनुमानभक्त म्हणून ओळखले जातात. त्यांचे मूळ नाव लक्ष्मण नारायण शर्मा असे सांगितले जाते. भक्त त्यांना प्रेमाने 'महाराजजी' असेही संबोधत. ते भगवान हनुमानाचे निस्सीम भक्त होते. साधेपणा, सेवा, प्रेम आणि भक्ती यावर बाबांनी विशेष भर दिला. उत्तराखंडमधील कैंची धाम हे त्यांच्या प्रमुख आश्रमांपैकी एक असून आज ते प्रसिद्ध तीर्थस्थळ मानले जाते. त्यांच्या जीवनाशी संबंधित अनेक चमत्कारांच्या कथा भक्तपरंपरेत सांगितल्या जातात. त्यापैकीच रेल्वे थांबण्याची कथा आहे. भारताबाहेरही त्यांचा प्रभाव पोहोचला. अमेरिकन आध्यात्मिक साधक राम दास (Richard Alpert) हे त्यांच्या प्रसिद्ध शिष्यांपैकी एक होते. नीम करोली बाबांनी मानवसेवा आणि गरजूंची मदत यांना आध्यात्मिक साधनेशी जोडले. नैनीतालजवळील उत्तराखंडमध्ये असलेले कैंची धाम नीम करोली बाबांशी जोडलेले प्रमुख स्थान आहे. येथे हनुमान मंदिर आणि आश्रम आहे. दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक येथे दर्शनासाठी येतात.

## शिवमहिम्न स्तोत्राची रचना कशी झाली?

भगवान शिवांची स्तुती करणाऱ्या अनेक स्तोत्रांमध्ये 'शिवमहिम्न स्तोत्रा'ला विशेष महत्त्व आहे. या स्तोत्राच्या रचनेमागे गंधर्वराज पुष्पदंत यांच्याशी संबंधित एक अद्भूत पौराणिक कथा सांगितली जाते. शिवपूजेसाठी फुले चोरून नेणे आणि त्यानंतर शिव-निर्माल्याचा अनादर केल्यामुळे पुष्पदंताची दिव्य शक्ती नष्ट होणे, अशी ही कथा आहे. पुढे पश्चात्ताप झाल्यानंतर त्यांनी भगवान शिवांची स्तुती केली आणि हीच स्तुती 'शिवमहिम्न स्तोत्र' म्हणून प्रसिद्ध झाली, अशी धार्मिक मान्यता आहे. पौराणिक कथेनुसार, एका राजाच्या राजवाड्यालगत सुंदर आणि विस्तीर्ण उपवन होते. या उपवनात विविध प्रकारची सुगंधी आणि दुर्मीळ फुले उमलत असत. राजा या फुलांचा उपयोग भगवान शिवांच्या पूजेसाठी करत असे. मात्र काही काळानंतर उपवनातील फुले दररोज चोरीला जाऊ लागली. विशेष म्हणजे ही फुले कोण चोरून नेत आहे, याचा कोणालाही थांगपत्ता लागत नव्हता. राजाने चोराचा शोध घेण्यासाठी अनेक प्रयत्न केले; मात्र त्याला यश आले नाही. कथेनुसार, गंधर्वराज पुष्पदंत भगवान शिवांचे भक्त होते. ते शिवपूजेसाठी या उपवनातील सुंदर फुले घेऊन जात असत. त्यांच्याकडे दिव्य शक्ती असल्यामुळे ते अदृश्य होऊन उपवनात प्रवेश करत आणि कोणालाही न दिसता फुले घेऊन निघून जात. त्यामुळे उपवनातील फुले नेमकी कोण चोरून नेत आहे, हे राजाला समजत नव्हते. अखेर राजाला समजले की भगवान शिवाला अर्पण केलेली फुले आणि अन्य पूजासाहित्य 'शिव-निर्माल्य' मानले जाते आणि त्याचा अनादर करणे योग्य नाही. त्यानंतर पुष्पचोराला पकडण्यासाठी राजाने एक युक्ती केली. भगवान शिवाला अर्पण केलेल्या फुलांच्या माळा उपवनाच्या प्रवेशमार्गावर अशा प्रकारे ठेवण्यात आल्या की उपवनात येणाऱ्या व्यक्तीचा पाय त्यावर पडेल. दुसऱ्या दिवशी पुष्पदंत नेहमीप्रमाणे आपल्या अदृश्य होण्याच्या शक्तीचा वापर करून उपवनात प्रवेश करू लागले. मात्र अनवधानाने त्यांचा पाय शिव-निर्माल्यावर पडला. कथेनुसार, शिव-निर्माल्याचा अनादर झाल्यामुळे त्यांची अदृश्य होण्याची दिव्य शक्ती नष्ट झाली. त्यामुळे ते यापुढे अदृश्य राहू शकले नाहीत. पुष्पदंत यांनी ध्यान आणि दिव्यदृष्टीच्या माध्यमातून आपल्या शक्ती नष्ट होण्यामागचे कारण जाणून घेतले. भगवान शिवाला अर्पण केलेल्या निर्माल्यावर पाय पडल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. आपली चूक लक्षात आल्यानंतर पुष्पदंतांना पश्चात्ताप झाला. त्यांनी भगवान शिवांची शरणागती पत्करली आणि त्यांच्या अनंत महिमेचे गुणगान करण्यास सुरुवात केली. भगवान शिवांची स्तुती करत त्यांनी रचलेले हे स्तोत्र पुढे 'शिवमहिम्न स्तोत्र' म्हणून प्रसिद्ध झाले, अशी पौराणिक कथा आहे. या कथेतून भगवान शिवाप्रती भक्ती, पूजासाहित्यासंबंधी आदर आणि आपल्या चुकीची जाणीव झाल्यानंतर मनापासून केलेल्या पश्चात्तापाचे महत्त्व अधोरेखित होते.

# २ ऑक्टोबरला देशभरात यूपीआय बंद, गांधी जयंतीला व्यापाऱ्यांचा 'नो यूपीआय डे'




**मुंबई (प्रतिनिधी)–** डिजिटल इंडियाच्या युगात गुगल पे, फोन पे आणि पेटीएम सारख्या यूपीआय अ‍ॅप्सचा वापर करणाऱ्या नागरिकांसाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि मोठी बातमी समोर आली आहे. केंद्र सरकारने यूपीआय व्यवहारांवर लागू केलेल्या नव्या शुल्काविरोधात देशभरातील व्यापाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. १५ ऑक्टोबर २०२६ पासून लागू होणाऱ्या नव्या म चँट डिस्काउंट रेटच्या निषेधार्थ व्यापारी संघटनांनी थेट राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीच्या दिवशी, म्हणजेच २ ऑक्टोबर रोजी 'नो यूपीआय डे' पाळण्याचे मोठे आवाहन केले आहे.

'फेडरेशन ऑफ ऑल इंडिया व्यापार मंडळ' आणि 'कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स' यांसारख्या देशातील आघाडीच्या व्यापारी संघटनांनी हा मोठा निर्णय घेतला आहे. त्यानुसार, २ ऑक्टोबर रोजी देशभरातील छोटे-मोठे व्यावसायिक, किरकोळ दुकानदार आणि पेट्रोल पंप चालक यूपीआयद्वारे डिजिटल पेमेंट स्वीकारणार नाहीत. त्यामुळे त्या दिवशी ग्राहकांना खरेदीसाठी रोख रक्कम किंवा क्रेडिट, डेबिट कार्डचा वापर करावा लागणार आहे.

एमडीआर ही एक प्रकारची प्रोसेसिंग फी असते, जी डिजिटल पेमेंटची सुविधा देणाऱ्या बँका आणि पेमेंट गेटवेद्वारे व्यापाऱ्यांकडून वसूल केली जाते. सरकार आणि एनपीसीआयच्या नव्या निर्णयानुसार, १५ ऑक्टोबर २०२६ पासून २००० रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या यूपीआय व्यवहारांवर ०.४ % एमडीआर शुल्क आकारले जाणार आहे.

हे शुल्क कमाल ३०० रुपयांपर्यंत सीमित ठेवण्यात आले आहे. म्हणजेच व्यवहार १ लाख रुपयांचा असो वा १० लाख रुपयांचा, व्यापाऱ्याला जास्तीत जास्त ३०० रुपये शुल्क भरावे लागेल. किराणा, पेट्रोल-डिझेल, इलेक्ट्रॉनिक्स आणि धान्यांसारख्या व्यवसायांमध्ये आधीच नफ्याचे प्रमाण अत्यंत कमी असते. त्यात आता अतिरिक्त ०.४०% शुल्क भरावे लागल्यास मोठा आर्थिक फटका बसणार असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

या निर्णयाविरोधात २३ सप्टेंबर रोजी मध्य प्रदेशातील भोपाळ, इंदूर, ग्वाल्हेर आणि मुझफ्फरपूर यांसारख्या शहरांमधील तब्बल १२५ व्यापारी संघटनांनी प्रातिनिधिक स्वरूपात 'नो यूपीआय डे' पाळला, ज्यामुळे तेथील २५ % व्यवहार प्रभावित झाले. इंदूर रिटेल गार्मेंट्स असोसिएशनने तर १५ ऑक्टोबरपूर्वी हा निर्णय मागे न घेतल्यास सर्व यूपीआय क्यूआर कोड मशीन्स पाण्यात फेकून देऊ, असा इशाराच दिला आहे.

तसेच महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष रवींद्र मंगवे यांनीही या आंदोलनाला पूर्ण पाठिंबा दिला आहे. 'ऑल इंडिया मोबाईल रिटेलर्स असोसिएशन', 'ऑल इंडिया ज्वेलर्स अँड गोल्डस्मिथ फेडरेशन' आणि 'रिटेल ट्रेडर्स वेल्फ `यर असोसिएशन' यांसारख्या प्रमुख संघटना २ ऑक्टोबरच्या आंदोलनात सक्रिय सहभागी होणार आहेत.

सध्या हे एमडीआर शुल्क दुकानदारांवर लावण्यात आले असले, तरी व्यापारी आपले नुकसान भरून काढण्यासाठी हे शुल्क अप्रत्यक्षपणे ग्राहकांवरच ढकलण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सरकारने हा निर्णय मागे घेतला नाही, तर आगामी सणासुदीच्या काळात डिजिटल पेमेंट व्यवस्थेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत ३१ ऑक्टोबर रोजी सिंहस्थाचा शुभारंभ

**नाशिक (प्रतिनिधी)–** नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला वेग आला आहे. कुंभमेळ्याचा औपचारिक शुभारंभ ३१ ऑक्टोबर रोजी होणार असून, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत धर्मध्वजारोहणाचा भव्य सोहळा आयोजित करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, याच दिवशी सायंकाळी दक्षिण गंगा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोदावरी नदीची भव्य आरती होणार आहे. या आरतीमध्ये तब्बल साडेसहा हजार आदिवासी सहभागी होणार असल्याचे नियोजन आहे.

कुंभमेळ्याची सुरुवात धर्मध्वजारोहणाने करण्याची परंपरा आहे. त्यानुसार ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी शंकराचार्य आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत धर्मध्वजारोहणाचा कार्यक्रम होणार आहे. यानंतर सायंकाळी ७ वाजता गोदावरी आरती आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी सुमारे १५ हजार नागरिकांची उपस्थिती अपेक्षित असून, राष्ट्रपतींसोबत साडेसहा हजार आदिवासी आरतीमध्ये सहभागी होणार आहेत.

गोदा आरतीसोबतच या सोहळ्यात विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. दीपप्रज्वलन, शंखनाद, आकर्षक रोषणाई आणि दिव्य संध्या यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघणार आहे. राष्ट्रपतींची उपस्थिती लक्षात घेता सुरक्षा व्यवस्था आणि राजशिष्टाचाराच्या दृष्टीने आवश्यक तयारीलाही सुरुवात करण्यात आली आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर रामकुंड, कुशावर्त आणि नील पर्वत परिसरात विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्याचे नियोजन सुरू आहे. कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी कार्यक्रमाच्या नियोजनासंदर्भात माहिती दिली आहे.

## चौकशीची जाहीर नोटीस

अर्जदार क्र. १५६१/२६

सार्वजनिक न्यासाचे नाव –सारा बहुउद्देशिय सेवाभावी संस्था नांदेड ता.जि. नांदेड

अर्जदाराचे नाव–अब्दुल बारी अब्दुल समद.

सर्व संबधित लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड, विभाग नांदेड हे वर नमुद केलेल्या अहवाल अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१. वर नमुद केलेला सार्वजनिक न्यासा अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

खालील निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीचा आहे काय?

अ) जंगम मिळकत (वर्णन) : अर्जदार यांच्या कडे सभासद फी रुपये १०५७/– जमा आहेत.

ब) सदर मिळकत (वर्णन) : निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामधे कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देण्याचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत हि नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखे पासून तीस दिवसाच्या आत या कार्यालयाच्या पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास कांही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल व अर्जाच्या निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जाईल.

ही नोटीस माझ्या सहिनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड याचे शिक्यानिशी आज दिनांक २४/०९/२०२६ रोजी दिली.

(श्रीरामे बि. एन) अधीक्षक

वरिष्ठ लिपिक

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग नांदेड

# लातुरात डीआयजी पथकाच्या दोन ठिकाणी धाडी; २० जणांवर कारवाई, २७ लाखांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी विशेष पथक लातूर जिल्ह्यात रवाना केले होते. या पथकाने २३ सप्टेंबर रोजी दोन ठिकाणी जुगार अड्ड्यांवर धाडी टाकून २० जणांवर कारवाई केली.

पहिली कारवाई – देवणी येथे: देवणी पोलीस ठाणे हद्दीत शिवाजी सगर यांच्या शेतात सुरू असलेल्या तिर्रट जुगारावर छापा टाकून ९ हजार ३३० रुपये रोख, ९ मोबाईल, २ चारचाकी व २ दुचाकी असा एकूण १५ लाख ९३ हजार ८३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी ९ जणांविरुद्ध देवणी ठाण्यात गु.र.नं. ३२६/२०२६ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

दुसरी कारवाई – गांधी चौक येथे: लातूर शहरातील गांधी चौक हद्दीतील अशोका बार अँड लॉजच्या रूममध्ये सुरू असलेल्या जुगारावर छापा टाकून १ लाख ७७ हजार ९१० रुपये रोख, १३ मोबाईल, १ चारचाकी व ४ दुचाकी असा एकूण ११ लाख १७ हजार ९१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी ११ जणांविरुद्ध गांधी चौक ठाण्यात गु.र.नं. ६६३/२०२६ अन्वये गुन्हा दाखल झाला.

दोन्ही कारवायांमध्ये एकूण १ लाख ८७ हजार २४० रुपये रोख, २२ मोबाईल, ३ चारचाकी व ६ दुचाकी असा एकूण २७ लाख ११ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे, हवालदार प्रदीप खानसोळे, गणेश राठोड, संदीप वाघाडे व गजानन डवरे यांनी केली असून उपमहानिरीक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. दरम्यान, अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'खबर' हेल्पलाइन – ९१ ५० १०० १०० सुरू करण्यात आली असून नागरिकांनी माहिती द्यावी, असे आवाहन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

स्थापना दिनांक ०९/१०/१९८५ नोंदणी क्रमांक ११०१/१९८५

## विश्वकर्मा सहकारी औद्योगिक वसाहत देगलूर
### ता. देगलूर जि.नांदेड

## वार्षिक सर्वसाधरण सभेची नोटीस
### (फक्त संस्थेच्या सभासदासाठी)

दिनांक ११/०९/२०२६

सन्माननिय सर्व सभासद विश्वकर्मा सहकारी औद्योगिक वसाहत देगलूर ता. देगलूर जि.नांदेड सुचित करण्यात येते की, संस्थेची वार्षिक सर्व साधारण सभा दि.२७/०९/२०२६ रोज रविवार सकाळी ठिक ११ वाजता संस्थेचे अध्यक्ष श्री शंतनु सुरेशराव महाराज देगलूरकर यांच्या अध्यक्षते खाली घेण्याचे आयोजित केले आहे..

तरी कृपया सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

**सभेचे स्थळ : श्री अखंडानंद फर्निचर, श्री अखंडानंद सकुंलन, उदगीर रोड, देगलूर**

**सभेचे विषय :–**

१) मागील सर्व साधारण सभेचे वृतांत वाचुन कायम करणे.
२) संस्थेचे सन २०२५–२६ सालाचे आर्थिक पत्रकास मान्यता.
३) सन २०२६–२७ सालासाठी लेखा परिक्षकांची निवड करणे.
४) संस्थेच्या हिता विरूध्द गैरवर्तन करणाऱ्या सभासदा विरुध्द कार्यवाही करणे बाबत.
५) आयत्या वेळेचे विषय अध्यक्षाचे संमतीने चर्चेत घेण्यात येईल.

**सुचना –** १) सदरहू सभा कोरम अभावी तहकुब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी एक तासानंतर सभा घेण्यात येई. त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही.

**अध्यक्ष**
**विश्वकर्मा सहकारी औद्योगिक वसाहत**
**विश्वकर्मा सहकारी औद्योगिक वसाहत**
**देगलूर ता. देगलर जि.नांदेड**

# कृत्रिम बुद्धिमत्ता व भारतीय ज्ञान परंपरा यांचा समन्वय काळाची गरज : डॉ. रामदिनेवार

**मुंबई(प्रतिनिधी)–**कृत्रिम बुद्धिमत्ता ही आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानाची महत्त्वपूर्ण देणगी असली, तरी तिचा वापर भारतीय ज्ञानपरंपरेतील मूल्ये, नैतिकता, विवेक आणि मानवकल्याणाच्या दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि भारतीय ज्ञानपरंपरा यांचा समन्वय साधून तंत्रज्ञानाचा उपयोग मानवी जीवन अधिक समृद्ध, सर्जनशील आणि मूल्याधिष्ठित करण्यासाठी केला पाहिजे, असे प्रतिपादन वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर येथील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. गोविंद रामदिनेवार यांनी केले.

प्रल्हादराय दालमिया लायन्स कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स, सुंदर नगर, स्वामी विवेकानंद रोड, मालाड (पश्चिम), मुंबई येथे आयोजित 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि भारतीय ज्ञानपरंपरा' या कार्यशाळेत साधन व्यक्ती म्हणून ते बोलत होते.

डॉ. रामदिनेवार पुढे म्हणाले, भारतीय ज्ञानपरंपरेने ज्ञानाकडे केवळ माहिती म्हणून पाहिले नाही, तर ज्ञान, विवेक, आचार आणि मानवकल्याण यांचा समन्वय साधला. आज कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे माहिती आणि ज्ञानाची उपलब्धता अत्यंत वेगाने वाढत आहे. मात्र, माहितीचे ज्ञानात आणि ज्ञानाचे विवेकपूर्ण कृतीत रूपांतर करण्यासाठी भारतीय चिंतनपरंपरेतील मूल्यदृष्टी आवश्यक आहे.

यावेळी प्राचार्य डॉ. दिगंबर गंजेवार म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता हे केवळ तंत्रज्ञानाचे साधन नसून शिक्षण, संशोधन, व्यवसाय आणि सामाजिक जीवनाच्या अनेक क्षेत्रांमध्ये परिवर्तन घडवून आणणारी शक्ती आहे. मात्र, कोणतेही तंत्रज्ञान मानवकेंद्री आणि मूल्याधिष्ठित असेल, तरच त्याचा खरा उपयोग समाजाला होतो. भारतीय ज्ञानपरंपरेने सत्य, विवेक, नैतिकता, सहअस्तित्व आणि लोककल्याण यांना केंद्रस्थानी ठेवले आहे. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रगतीला भारतीय मूल्यविचारांची दिशा देणे ही आजच्या शिक्षणव्यवस्थेची महत्त्वाची जबाबदारी आहे.

कार्यशाळेस उपप्राचार्य डॉ. सुभाषिनी नायकर आणि कॉमर्स विभागप्रमुख डॉ. किरण माने यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रशांत पांडे यांनी केले, तर आभार डॉ. किरण माने यांनी मानले.

## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे नालंदा नगर मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था म. सांगवी बु. ता.जि. नांदेड या संस्थेच्या सभासदांना कळविण्यात येते की, श्री. सत्यप्रिय नागनाथ गोवंदे यांनी त्यांच्या नावावर असलेला प्लॉट क्र. ०६, हा विक्री करावयाचा असुन सदरील प्लॉट विक्री करण्यासाठी संस्थेकडे नाहरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि. २९/०४/२०२६ रोजी विनंती अर्ज सादर कलेला आहे.

त्यानुषंगाने नालंदा नगर मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था म. सांगवी बु. ता.जि. नांदेड या संस्थेच्या सभासदांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, श्री. सत्यप्रिय नागनाथ गोवंदे यांच्या प्लॉट बाबत काही आक्षेप / हरकती असल्यास या जाहीर प्रगटनाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास या बाबत कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरुन सदरील प्लॉट विक्री बाबत, नाहरकत देणे बाबतची कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**प्राधिकृत अधिकारी**
**नालंदा नगर मागासवर्गीय सहकारी**
**गृहनिर्माण संस्था म. सांगवी बु.**
**मो. नं. ७०२०४६८६५२**

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार श्री. गंगाधर जळबाजी मोरे, वय ६७ वर्षे, व्यवसाय, सेवानिवृत्त कर्मचारी, रा. कंधार, ता. कंधार, जि. नांदेड यांच्या सूचनेवरून व त्यांच्या वतीने हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सर्व संबंधितांना याद्वारे जाहीरपणे कळविण्यात येते की, श्री. मार्शल पि. सॅमसन डेविड, वय ३९ वर्षे, व्यवसाय : व्यापार, रा. मुखेड, ता. मुखेड, जि. नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील, मुखेड तहसील हद्दीतील त्यांच्या नावे असलेला गट क्र. ३३३-बी, प्लॉट क्र. २१, पूर्व-पश्चिम लांबी १२.१९ मीटर (४० फुट) व दक्षिण-उत्तर पूर्व बाजू रुंदी १०.०६ मीटर (३३ फुट), आणि पश्चिम बाजू ९.६० मिटर ( ३१.५ फुट) एकूण क्षेत्रफळ ११९.८८ चौ.मी., चतुःसीमा खालीलप्रमाणे आहे–

पूर्वेस : २० फुट रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं. २२

पश्चिमेस : प्लॉट नं. २७, उत्तरेस : प्लॉट नं. २०

सदर प्लॉटबाबत माझे पक्षकार श्री. गंगाधर जळबाजी मोरे व श्री. मार्शल सॅमसन डेविड यांच्यामध्ये दिनांक ३०/०६/२०२२ रोजी रुपये २,७५,०००/– मोबदल्यात विक्रीचा करारनामा झालेला आहे. सदर व्यवहारापोटी माझ्या पक्षकार रुपये १,२५,०००/– रक्कम श्री. मार्शल सॅमसन डेविड यांना दिनांक ३०/०६/२०२२ रोजी पंचासमक्ष अदा केलेली असून, सदर रक्कम त्यांनी प्राप्त केलेली आहे. उर्वरित रुपये १,५०,०००/– रक्कम सदर प्लॉटचे नोंदणीकृत विक्रीखत/खरेदीखत करून देताना अदा करण्याचे ठरलेले आहे. करारनाम्यानुसार सदर प्लॉटचे कायदेशीर व नोंदणीकृत विक्रीखत माझे पक्षकार यांच्या नावे करून देण्याची जबाबदारी श्री. मार्शल सॅमसन डेविड यांची आहे. तथापि, करारनामा झाल्यानंतरही त्यांनी आजपर्यंत माझ्या पक्षकारांच्या नावे सदर प्लॉटचे नोंदणीकृत विक्रीखत करून दिलेले नाही. उलट, वेळोवेळी वेगवेगळी कारणे सांगून व्यवहार पूर्ण करण्यास टाळाटाळ केलेली आहे. दिनांक २८/०८/२०२६ रोजी सदर प्लॉटचा व्यवहार करून देणार नसल्याचे सांगून त्यांनी सदर मालमत्तेबाबत जाहीर प्रगटन प्रसिद्ध केले असल्याचे माझ्या पक्षकाराच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे सदर गट क्र. ३३३-इ, प्लॉट क्र. २१ बाबत माझ्या पक्षकारांचा पूर्वीपासून वैध करारनामा व कायदेशीर हक्क अस्तित्वात आहे. म्हणून सर्व संबंधित व्यक्तींना याद्वारे स्पष्टपणे सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर प्लॉट मार्शल सॅमसन डेविड यांच्याकडून खरेदी करू नये, कोणताही व्यवहार करू नये, सदर मालमत्तेबाबत आगाऊ रक्कम देऊ नये किंवा कोणत्याही प्रकारचा हक्क निर्माण करून घेऊ नये. तसेच मार्शल सॅमसन डेविड यांनी सदर प्लॉट कोणत्याही तृतीय व्यक्तीस विक्री, हस्तांतरण, गहाण, दान अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करू नये व करारनाम्यात ठरल्या प्रमाणे उर्वरीत रक्कम घेवून माझ्या पक्षकारास कायदेशीर खरेदिखत करून द्यावे असे कळविण्यात येते. जर या जाहीर प्रगटनाची माहिती असूनही कोणत्याही व्यक्तीने सदर प्लॉटबाबत मार्शल सॅमसंग डेविड यांच्याशी व्यवहार केला, तर असा व्यवहार माझ्या पक्षकारांच्या हक्कांवर बंधनकारक राहणार नाही. हे जाहीर प्रगटन माझे पक्षकार गंगाधर जळबाजी मोरे यांच्या कायदेशीर हक्कांचे संरक्षण करण्यासाठी व सर्व संबंधितांना पूर्वसूचना देण्यासाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

मार्फत | जाहीर प्रगटन देणार
अ‍ॅड. जी. पी. देवकत्ते | गंगाधर जळबाजी मोरे

## Change In Name

My old name is **SABEENA KHANUM SIDDIQUI SADIQUE** which now I am changing as new name **SABEENA KHANAM SADIQ AHMED SIDDIQUI**. Hence forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same. **Address -** H. No. A\4 unit-3, Mantri Nager, Malegaon Road, Behind S.B. I. Nanded-431605 Mo. No. 9890854819

## Change In Name

My Old Name Is **Sonali Kauthekar** Now I Am Changing As New Name is **Sonali Kavthekar**.Heance Forth My All Correspondence Will Be Done As Per My New Name. Please Kindly Consider The Same.

**Address-** C/o Shankar Vitthalrao Kawthekar-118, Padmaja, Asarjan Road Vishnupuri, Nanded-431606

## Change In Name

My old name is **KHUSRO AHMED** which now I am changing as new name KHUSRO **AHMED MOINUDDIN SIDDIQUI**. Hence forth my all correspondence will be done as per my new name. Please Consider the same.

**Address -** H. No. A\4 unit-3, Mantri Nager, Malegaon Road, Behind S. B. I. Nanded-431605 Mo. No. 9890854819

## Change In Name

My Old Name Is **Sushil Kauthekar** Now I Am Changing As New Name is **Sushil Kavthekar**.Heance Forth My All Correspondence Will Be Done As Per My New Name. Please Kindly Consider The Same.

**Address-** C/o Shankar Vitthalrao Kawthekar-118, Padmaja, Asarjan Road Vishnupuri, Nanded-431606

## Change In Name

My old name is **SIDDIQUI SADIQUE AHMED** which now I am changing as new name **SADIQUE AHMED KHUSRO AHMED SIDDIQUI**. Hence forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

**Address -** H. No. A\4 unit-3, Mantri Nager, Malegaon Road, Behind S. B. I. Nanded-431605 Mo. No. 9890854819

## Change In Name

My Old Name Is **Parth Kauthekar** Now I Am Changing As New Name is **Parth Kavthekar**.Heance Forth My All Correspondence Will Be Done As Per My New Name. Please Kindly Consider The Same.

**Address-** C/o Shankar Vitthalrao Kawthekar-118, Padmaja, Asarjan Road Vishnupuri, Nanded-431606

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस संबंधितांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, संस्थेचे सभासद हरमितसिंघ महेंद्रसिंघ रागी यांच्या सर्व्हे क्र. ७८ क मधील सिटी सर्व्हे नं. १०७७२ पैकी प्लॉट क्र. ९ व १० चा भाग ज्याची साईज २५ बाय ६० ज्याचे एकूण क्षेत्रफळ १५०० चौरस फुट आहे. सदर प्लॉटची चतुःसीमा–

पूर्वेस–प्लॉट नं. १० चा भाग

पश्चिमेस–प्लॉट नं. ९ चा भाग


दक्षिणेस–रोड

उत्तरेस–सर्व्हे नं. ७८ ब असून, चतुःसीमे आतील वर्णनाचा प्लॉट करिष्माकौर राजूसिंघ कामठेकर यांना वरील सभासद यांच्याकडून १५०० चौरस फुटाचा प्लॉट विक्री करण्यासाठी संस्थेकडे अर्ज केला आहे. तरी प्लॉट बाबत कोणास काही आक्षेप उजर, मालकी हक्क, देवाण-घेवाण, कुळ कर्ज, गहाण इत्यादी असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत संस्थेकडे लेखी कागदपत्रांसह आपला आक्षेप नोंदवावा. मुदत संपल्यानंतर कोणाचाही आक्षेप स्वीकारल्या जाणार नाही व संस्थेवर बंधनकारक राहणार नाही. म्हणून हे जाहीर प्रगटन नंदीग्राम गृहनिर्माण संस्था मर्यादित नांदेड प्रसिद्ध करीत आहे.

जाहीर प्रगटन देणार
अध्यक्ष/सचिव
नंदीग्राम गृहनिर्माण संस्था मर्यादित नांदेड


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## ६ ठिकाणांहून ६७५ किलो अन्नसाठा जप्त; ५४ अन्न नमुने विश्लेषणासाठी पाठविले

### सणासुदीच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाची विशेष तपासणी मोहीम

**नांदेड (प्रतिनिधी)** –सणासुदीच्या काळात नागरिकांना सुरक्षित व दर्जेदार मिठाई, खवा, दूध, दुग्धजन्य पदार्थ तसेच इतर अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून 'सुरक्षित अन्न, सुरक्षित महाराष्ट्र' ही राज्यव्यापी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत अन्न व औषध प्रशासन, नांदेड कार्यालयामार्फत जिल्ह्यात विशेष तपासणी अभियान राबविण्यात आले.

या अभियानात विविध ६ आस्थापनांची तपासणी करून ८ अन्न नमुने घेण्यात आले असून, एकूण ६७५ किलो अन्नसाठा, अंदाजे किंमत २ लाख ८९ हजार ८० रुपये जप्त करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या साठ्यामध्ये तूप, खवा, कुंदा पेढा, स्वीट पेढा, मावा पेढा तसेच खाद्यतेलाचा समावेश आहे.

या तपासणीदरम्यान मे. शिवकृपा दूध भांडार, देगलूर नाका नांदेड येथून ८८ किलो तूप व ४९ किलो खवा, मे. श्रीसाई खवा सेंटर, मालेगाव रोड नांदेड येथून ९९ किलो खवा, मे. खंडेलवाल मिठाई, एमआयडीसी, नांदेड येथून ९९ किलो खवा जप्त करण्यात आला. तसेच मे. बदामराव पेढेवाले, पाळज, ता. भोकर येथून ३८ किलो कुंदा पेढा व ७८ किलो स्वीट पेढा, मे. काशीराम दाचावर, कुंडलवाडी, ता. बिलोली येथून १४६ लिटर रिफाईंड सोयाबीन तेल (कृष्णा गोल्ड) आणि मे. जगदंबा बिकानेर, वाई बाजार, ता. माहूर येथून ७८ किलो मावा पेढा जप्त करण्यात आला.

याशिवाय जिल्ह्यातील स्वीट मार्ट, दूध व दुग्धजन्य पदार्थ तसेच इतर खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्या २८ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. या तपासणीदरम्यान खवा, पनीर, पेढा, बर्फी, खाद्यतेल आदींचे एकूण २६ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेऊन प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहेत. नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे.

सणासुदीच्या काळात अन्नपदार्थांची खरेदी करताना ग्राहकांनी परवानाधारक विक्रेत्यांकडूनच अन्नपदार्थ खरेदी करावेत. पॅकबंद अन्नपदार्थ खरेदी करताना पॅकिंगवरील माहिती, वैधता कालावधी व इतर आवश्यक तपशील तपासून घ्यावेत. मिठाई व दुग्धजन्य पदार्थांची योग्य ठिकाणी साठवणूक करण्यात आली आहे का, तसेच त्यांचा लवकर वापर केला जातो का, याचीही दक्षता घ्यावी.

अन्न भेसळ अथवा असुरक्षित अन्नपदार्थांची विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी अन्न व औषध प्रशासन, नांदेड कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच FOSCOS या ऑनलाइन पोर्टलवर अथवा complaints.mahafda.in या पोर्टलवर तक्रार नोंदवावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन, नांदेड कार्यालयाच्या सहायक आयुक्तांनी केले आहे.

## दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या रजेला निर्बंध

### दुष्काळ निवारण, पीक पाहणी, कर्ज पुनर्गठन व शेतकरी सहाय्याच्या कामांना सर्वोच्च प्राधान्य देण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाची यंत्रणा अधिक गतिमान व सतर्क ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील क्षेत्रीय प्रमुख विभागांच्या जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या रजा मंजुरीबाबत कठोर निर्देश जारी केले आहेत.

जिल्ह्यात पाणीसाठा, चाराटंचाई तसेच पिकांचे नुकसान यामुळे शेतकरी बांधवांसमोर आर्थिक व मानसिक संकट निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांना गती देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शासनाच्या विविध आर्थिक सवलतींची प्रभावी अंमलबजावणी, कर्जमाफी, बियाणे व खते वाटप, पीक कर्ज पुनर्गठन तसेच शेतकरी सहाय्याच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे, असे निर्देश परिपत्रकाद्वारे देण्यात आले आहेत.

महसूल, कृषी, ग्रामविकास, नगरविकास, महावितरण, पशुसंवर्धन, जलसंपदा, जलसंधारण, सहकार आणि भूमी अभिलेख (मोजणी) या विभागांतील सर्व जिल्हास्तरीय तसेच तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी दुष्काळ निवारण, पीक पाहणी, कर्ज पुनर्गठन आणि शेतकरी सहाय्याच्या कामांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे. कोणत्याही अधिकाऱ्यास पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

दुष्काळी परिस्थिती संपेपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारची रजा, अतितातडीची स्वेच्छिक रजा वगळता, संबंधित जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या पूर्वपरवानगीनेच मंजूर करता येईल. क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या रजा मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी कोणतेही असले, तरी सद्यस्थितीत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय रजा मंजूर करता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## नांदेडकरांसाठी मनपाचा दिलासा; जन्म-मृत्यू दाखला आता कोणत्याही क्षेत्रीय कार्यालयात मिळणार



**नांदेड (प्रतिनिधी)**– महापालिकेने नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्रासाठी केवळ संबंधित क्षेत्रीय कार्यालयावर अवलंबून राहावे लागणार नाही.

मनपाच्या सर्व ६ क्षेत्रीय कार्यालयांसह मुख्यालयातील अविरत विभागातून हे प्रमाणपत्र मिळणार आहे. शहरातील कोणत्याही खासगी अथवा शासकीय दवाखान्यात, रुग्णालयात किंवा रुग्णालयाबाहेर जन्म-मृत्यू झाल्यास त्याची नोंदणी झाल्यानंतर नागरिक कोणत्याही जवळच्या क्षेत्रीय कार्यालयातून प्रमाणपत्र घेऊ शकतात.

अपवाद – २०१७ पूर्वीचे जुने दाखले, – क्यूआर कोड असलेले प्रमाणपत्र, जुन्या दाखल्याची दुसरी प्रत ही कामे केवळ मनपा मुख्यालयातील अविरत विभागातूनच होतील. केंद्र शासनाच्या CRS प्रणालीत एकच युजर आयडी असल्याने क्षेत्रीय कार्यालयातून QR कोड प्रमाणपत्र मिळणार नाही.

नागरिकांनी या सुलभ सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी केले आहे.

## नांदेड पोलिसांचे विशेष कॉम्बिंग ऑपरेशन; ६९ सराईतांची झाडाझडती, ३ गुन्हे दाखल




**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने २३ सप्टेंबर रोजी रात्री ११ ते २४ सप्टेंबर पहाटे ३ वाजेपर्यंत जिल्हाभर विशेष कॉम्बिंग ऑपरेशन राबवण्यात आले.

या मोहिमेत सराईत गुन्हेगार, अवैध शस्त्र बाळगणारे, हद्दपार व्यक्ती, हिस्ट्रीशीटर आणि फरारी आरोपींची सखोल तपासणी करण्यात आली.

मोहिमेतील कारवाईचा आढावा – मोहिमेत सहभागी अधिकारी ५५, अंमलदार १९२, तपासलेले तडीपार गुन्हेगार २३, MPD मधून सुटलेले तपासलेले गुन्हेगार २७, तपासलेले सराईत गुन्हेगार ६९, समन्स बजावणी ४२, बेलेबल वॉरंट २७, नॉन बेलेबल वॉरंट अंमलबजावणी १९. दाखल झालेले गुन्हे – या मोहिमेदरम्यान ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

भाग्यनगर– कलम १२२ मपोका – २ आरोपी, विमानतळ– कलम १२२ मपोका – १ आरोपी, नांदेड ग्रामीण– कलम ४/२५ शस्त्र अधिनियम – १ आरोपी.

या मोहिमेत अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, सुरज गुरव, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व ठाणे प्रभारी, स्थानिक गुन्हे शाखा आणि ठउझ पथकाने सहभाग घेतला. जिल्ह्यात शांतता राखण्यासाठी अशा मोहिमा पुढेही सुरू राहतील, असे पोलीस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांनी सांगितले.



**नांदेड–** व्यंकटेश नगर येथील श्री गणेशाची आरती नांदेड दक्षिणचे शिवसेना आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते करण्यात आली. याप्रसंगीच्या छायाचित्रात संपादक केशव घोणसे पाटील, राजेंद्र कौडगे, शिवाजी पवार, शिवसेना महानगरप्रमुख दीपक स्वामी, सुनील लख्खे, मुरकुटे आदी दिसत आहेत.

## २६ वर्षांची परंपरा कायम; सांगवीत अनंत चतुर्दशीला २० क्विंटल तांदळाचा महाप्रसाद –दत्ता पाटील कोकाटे

**नांदेड (प्रतिनिधी)** –अनंत चतुर्दशीनिमित्त सांगवी (बु.) येथील आसना नदी विसर्जन घाटावर शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजल्यापासून गणेशभक्तांसाठी महा-प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

गेल्या २६ वर्षांपासून दत्ता पाटील कोकाटे परिवाराकडून ही सेवा अविरत सुरू आहे. भाजप महानगर उपाध्यक्ष दत्ता पाटील कोकाटे यांच्या पुढाकारातून यंदाही २० क्विंटल तांदळाच्या खिचडीचा महाप्रसाद तयार करण्यात येणार आहे.

आसना बायपास नदी घाटावर विसर्जनासाठी येणाऱ्या हजारो गणेश भक्तांना या महाप्रसादाचा लाभ मिळणार आहे. गणरायाला निरोप देण्यासाठी येणाऱ्या भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

मनपा प्रभाग क्र. ३ मधील या कार्यक्रमाचे आयोजन भाजप महानगर उपाध्यक्ष दत्ता भुजंगराव पाटील कोकाटे, माजी नगरसेविका नागाबाई कोकाटे, श्रीराम ग्रेनाईट अँड टाईल्सचे अंकुश कोकाटे आणि श्रीराम कोकाटे यांच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी दत्ता पाटील मित्र मंडळाचे सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

## गजानन जोशी यांची भाजपा मराठवाडा विभागीय प्रसिद्धी प्रमुखपदी निवड



**मुंबई/नांदेड (प्रतिनिधी)**– भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष यांच्या सूचनेनुसार आणि पक्षाचे संघटनात्मक कार्य अधिक गतिमान करण्यासाठी नांदेड येथील पक्षाचे कार्यकर्ते गजानन जोशी यांची मराठवाडा विभागीय प्रसिद्धी प्रमुखपदी तात्काळ प्रभावाने निवड करण्यात आली आहे.

या महत्त्वपूर्ण जबाबदारीमुळे मराठवाडा विभागातील पक्ष संघटन, शासनाचे लोककल्याणकारी निर्णय आणि विविध उपक्रम जनमानसात प्रभावीपणे पोहोचण्यास मोठी मदत होणार आहे. भाजपा महाराष्ट्र प्रदेश माध्यम प्रमुख गोविंद येतयेकर यांनी या निवडीची घोषणा केली असून, गजानन जोशी यांच्या या नियुक्तीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## नांवामनपाची रविवारी सर्वसाधारण सभा

### सेवानिवृत्त सभासद कर्मचारी व गुणवंत पाल्यांचा सत्कार

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड – वाघाळा शहर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, नांदेड सन २५-२६ सहकार वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २७ सप्टेंबर रोजी सकाळी गणेश नागरगोजे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमात सेवानिवृत्त सभासद कर्मचारी व गुणवंत पाल्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

मागील झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून तेरीज पत्रक, नफा तोटा पत्रक, ताळेबंद पत्रकास मान्यता देणे, अंदाज पत्रकास मान्यता देणे व २५-२६ सालाचे अंदाजपत्रकातील खर्चास मान्यता देणे, व्याज मान्यता देणे, नफा वाटपास मान्यता देणे, सन २१ ते २७ च्या ऑडीटसाठी लेखा परीक्षकाची नेमणूक करणे बाबत. ऑडीट रिपोर्टचे वाचन व त्यावरील दोषाची दुरुस्ती केलेल्या दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे, सभासदांच्या मुलाच्या लग्नाकरिता कर्ज वाटप योजना लागू करणे बाबत, विचारविनिमय करणे, मयत सभासद सानुग्रह अनुदान रु. रु.५०,००० वाटप करणेस मान्यता देणे बाबत चर्चा, याशिवाय ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा या विषयावर होणार असून, सेवानिवृत्त सभासद कर्मचारी व गुणवंत पाल्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

सदरील सर्व साधारण सभा कै. शंकरराव चव्हाण सभागृह, स्टेडियम, नांदेड येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेला सभासदांनी उपस्थित राहण्याचे आवाहन सचिव विशाल बालाजी सोनकांबळे यांनी केले आहे.

## अनुसूचित जमाती विकास श्वेतपत्रिकेच्या मागणीसाठी रॅली व धरणे आंदोलन



**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र अनुसूचित जमाती विकासाची श्वेतपत्रिका जाहीर करण्याच्या मागणीसाठी गुरूवार, दि. २४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता महात्मा फुले पुतळा आयटीआय ते जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे रॅली काढण्यात आली. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शांततामय बेमुदत धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व आदिवासी कोळी महादेव समाज मराठवाडा विभागाचे अध्यक्ष नागनाथराव घिसेवाड यांनी केले.

महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींच्या विकासासाठी शासनाने केलेली आर्थिक तरतूद, प्रत्यक्ष खर्च, योजना, लाभार्थी व प्रत्यक्ष लाभ याची अधिकृत माहिती जनतेसमोर यावी. तसेच शिक्षण, शिष्यवृत्ती, वसतिगृह, आश्रमशाळा, रोजगार, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रक्रिया आणि न्यायालयीन निकाल याबाबत पारदर्शक अधिकृत माहिती उपलब्ध व्हावी. जनगणनेपासून प्रत्यक्ष लाभापर्यंतची अधिकृत आकडेवारी जनतेसमोर आणावी. अनुसूचित जमातींसाठीची तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती जाहीर करावी आदी मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले.

या रॅली व धरणे आंदोलनात आदिवासी कोळी महादेव समाज मराठवाडा विभागाचे अध्यक्ष नागनाथराव घिसेवाड, व्यंकट मुदिराज, शशिकांत भुसेवाड, ॲड. परमेश्वर गोणारे, केरबा जेठेवाड, गिरीधर मोळके, केशव कुकलवाड, के. पी. सोने, सिद्धेश्वर पिटलेवाडी, केशव जिंकलवाड, रमेश जेठेवाड, आनंदा रेजितवाड, मारोती मामीलवाड, प्रा. भगवान गुंजलवाड, पुंडलिक मोरे, गंगाधर कल्याणकर, डी.एम. भामटे, लक्ष्मी धोरपडे, अर्चना गुंजावळे, ॲड. चंद्रकला जेठेवाड, मुक्ताबाई मनाठकर यांच्यासह नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थी, युवक, महिला, कर्मचारी, शेतकरी आणि ज्येष्ठ नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## गणेश दर्शन



श्री राणा प्रताप गणेश मंडळ, राजपूत संघ बडी मढी, गाडीपुरा, नांदेड



श्री अष्टविनायक गणेश मंडळ, बालाजी मंदिर पारसनगर, नांदेड



श्री शिवनेरी गणेश मंडळ, गणेश नगर, नांदेड



श्री दक्षिण मुखी काला हनुमान गणेश मंडळ सिडको, नांदेड



श्री श्रीकृष्ण गणेश मंडळ, मिलगेट परिसर (छाया : करणसिंह बैस)


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com